|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : ३८ सोमवार दि. २३ सप्टेंबर २०२४ ते रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## कुटुंबाला त्रास देऊ लागताच थोरल्याचे ठरले दारुड्या भावाला त्याने धरणात बुडवून मारले

विक्रमगड/क्राईम रिपोर्टर


दारुडा माणूस हा कुटुंबासाठी नेहमीच डोकेदुःखी ठरलेला असतो. एकतर तो कामधंदा करीत नाही. वरून दारूसाठी कुटुंबालाच सतावत असतो. त्यामुळे या रोजच्या त्रासाला कुटुंबीय कंटाळलेले असतात. अशावेळी त्यांच्या मनात वेगळा विचारही येऊ शकतो. विक्रमगड जवळच्या सजन गावात अशीच एक घटना घडली. आकाश लोहार आणि शिवम लोहार हे दोन सख्खे भाऊ यातील शिवम धाकटा भाऊ त्याला दारूचे व्यसन होते. तो कुठेही कामधंदा करीत ...पान २ वर

## स्वप्नातील मृतदेह खेडच्या भोस्ते घाटात दिसला फिर्यादी योगेशच खुनाच्या चक्रव्युहात फसला



खेड/क्राईम रिपोर्टर

सध्याच्या विज्ञान युगात स्वप्न, भास, श्रद्धा, पुनर्जन्म या गोष्टीवर कुणीही विश्वास ठेवत नाही. माणसाला स्वप्न पडतात. पण स्वप्नात दिसलेली व्यक्ती, स्थळ किंवा घटना या खऱ्याच असतील यावर कुणीही विश्वास ठेवू शकत नाही. कारण स्वप्न ही आभासी असतात. त्यामुळे स्वप्नातील खरेपणा शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वतःची फसवणूक करण्यासारखे आहे. स्वप्नात एखाद्या माणसाला तो पंतप्रधान झाल्याचे दिसते किंवा लॉटरी लागून तो करोडपती झाल्याचे दिसते. पण स्वप्नातून जेंव्हा तो जागा होतो तेंव्हा त्याला वास्तवाची जाणीव होते. त्यामुळे स्वप्नात दिसलेल्या गोष्टींवर कुणी विश्वास ठेवू नये. पण काही लोक असे असतात की स्वप्नाचा आधार घेवून पोलिसांना चाकवण्याचा प्रयत्न करतात. पण शेवटी कायद्याला दृश्य पुरावा लागतो. त्यामुळे पोलिसांच्या समोर स्वप्नातील घटना विश्वसनीय ठरू शकत नाहीत. काही वर्षापूर्वी पार्थो घोष यांचा '१00 डेज' नावाचा एक हिंदी सिनेमा आला होता. त्यात ज्यांचा खून होणार असतो त्या खुनाची घटना अगोदर चित्रपटाची नायिका असलेल्या माधुरी दीक्षितला स्वप्नात दिसते. पण चित्रपटातील अशाच घटनांचा आधार घेत यापूर्वी खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींनी पोलिसांच्या समोर येऊन मी स्वप्नात एक खुनाची घटना पाहिली आहे असा दावा करून स्वतःला साक्षीदार किंवा फिर्यादी बनवण्याचा प्रयत्न केला होता.



संशयीत आरोपी योगेश आर्या

पण 'कानुन के हात बडे लंबे होते है' कारण आरोपी किती जरी शातीर असला तरी सुतावरून स्वर्ग गाठणारे पोलीस आरोपी पेक्षा दोन पावले पुढे असतात. त्यामुळे त्यांच्या समोर आरोपीची बनवाबनवी चालत नाही, तो पकडला जातो. सावंतवाडीतील योगेश आर्या याला स्वप्नात खेडच्या भोस्ते घाटातील मृतदेह दिसला. तो मृतदेह त्याच्याशी बोलला आणि त्याने सांगितले कि मला मदत करा. त्यानंतर योगेशने खेड पोलीस ठाण्यात येऊन या घटनेची माहिती दिली. पोलिसांचा अगोदर विश्वास बसला नाही. पण नंतर मात्र पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता खरोखरच तिथे त्यांना एक मृतदेह आढळला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मृतदेहाच्या जवळ ज्या वस्तू होत्या त्या योगेश आर्याने स्वप्नात पाहिलेल्या आणि पोलिसांना सांगितलेल्या होत्या. इतका योगायोग असूच शकत नाही. त्यामुळे हा सर्व योगेश आर्याचाच बनाव असल्याचा पोलिसांना संशय आला आणि त्यांनी योगेशला अटक केली. त्यातच योगेश पोलिसांच्या अगोदर घटनास्थळी जावून आला होता याची एका चहा टपरीवाल्याने पुष्टी केली. त्याच्याकडून योगेशने दोन वडापाव घेतले आणि जंगलातील टॉवरजवळ जाण्याचा रस्ता कुठून जातो असे विचारले होते. त्यामुळे योगेश वरील संशयाला बळकटी मिळाली असून या हत्येशी त्याचे काहीतरी कनेक्शन आहे असा पोलिसांना ठाम विश्वास आहे, त्यामुळे योगेशची कसून चौकशी सुरु आहे. ...पान २ वर

## शरीरसुख घेताना मुलीला रंगेहात धरले प्रियकराच्या मदतीने आईला ठार मारले






रायगड/क्राईम रिपोर्टर

**आजकालची मुले सुखाला चटावलेली असतात. स्वतःच्या सुखापुढे त्यांना रक्ताच्या नात्याचीही परवा नसते. अशावेळी ज्या आई-वडिलांनी आपल्याला जन्माला घातले. काबाडकष्ट करून मोठे केले. त्याचीही मुलांना जाणीव नसते. तसे पाहत आई आणि मुलीचे एक वेगळेच जिव्हाळ्याचे नाते असते. पण कधी कधी मुलीकडून या नात्याला कलंक लावला जातो. रायगड जिल्ह्यातील परखंडे अहिल्या नगर भागात अशाच एका घटनेत आईने मुलीला प्रियकराशी सेक्स करताना पाहिले. त्यामुळे चिडलेल्या मुलीने प्रियकराच्या मदतीने आईची हत्या केली.**

प्रियकरासोबत सेक्स करताना आईने पाहिल्याने मुलीने प्रियकराच्या मदतीने आईचा खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मुलगी आणि तिच्या प्रियकराने गळा दाबून आईचा खून केल्याची घटना रायगडातून समोर आली. रायगडच्या परखंदे अहिल्यानगर गावात ही घटना घडली आहे. ४२ वर्षीय मृत संगीता मारुती झोरे या दोन मुलींसह परखंदे अहिल्यानगर या गावात वास्तव्यास होत्या.

पोलिसांच्या माहितीनुसार, मंगळवारी १० सप्टेंबरला पहाटे साडेचारच्या सुमारास संगीता यांना अचानक झोपेतून जाग आली. त्यावेळी संगीता यांनी आपली मोठी मुलगी भारती हिला तिचा प्रियकर संतोष दत्तात्रय नांदगावकर याच्यासोबत सेक्स करीत असताना पाहिले. संगीता यांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. एवढ्यात संतोष नांदगावकर याने संगीता यांचे तोंड दाबले आणि त्यांनी जमिनीवर पाडले. त्यांच्या तोंडावर ब्लॅन्केट दाबून धरले. तर मुलगी भारतीने आई संगीताचे पाय धरुन ठेवले. संगीता यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण श्वास कोंडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. एवढ्यावरच न थांबता भारती आणि संतोष यांनी संगीत यांच्या खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांचा मृतदेह साडीने घराच्या छताला असलेल्या लोखंडी पाईपला लटकवला व त्या ठिकाणी लाकडी स्टूल ठेवून आत्महत्या असल्याचे भासवले. परंतु संगीता यांची दुसरी मुलगी सुरेखा घडलेला हा सर्व प्रकार आपल्या डोळ्यांनी पाहिला. तिने आपल्या ...पान २ वर

## सर्पमित्राने अंगावर साप टाकला निरपराध संतोष जीवाला मुकला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



**स्टंटबाजी हा आजकालच्या तरुणांचा छंद बनलाय. मग ती रेल्वेच्या दरवाजात लटकून केलेली स्टंटबाजी असो कि प्राण्यांसोबत फोटो काढण्याची स्टंटबाजी असो. मात्र कधी कधी अशाप्रकारचे धाडस प्राणावर बेतू शकते. चिखली गावात मित्राच्या भावाच्या वाढदिवसाला गेलेल्या संतोष नावाच्या तरुणाला एका सर्पमित्राने साप हातात घेऊन फोटो काढण्याचा आग्रह धरला. पण त्याने नकार देताच त्याने तो साप संतोषच्या अंगावर टाकला. मात्र त्या सापाने संतोषच्या बोटाचा चावा घेताच त्याचा तडफडून मृत्यू झाला. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे, तर सर्पमित्र फरार आहे.**

वाढदिवस म्हणजे आनंदात साजरा करण्याचा दिवस. पण अलिकडे वेगळेच चित्र दिसू लागले आहे. वाढदिवसाचे सेलिब्रेशन आता हुल्लडबाजी, स्टंटमध्ये बदलत आहे. चार केक भरविण्याचे क्षण आता रस्त्यावर वाढदिवस होण्यात बदलले आहेत. शहरात, खेड्यात दुचाकीवर केक कापणे, बर्थडे बॉयच्या चेहऱ्यावर केक घासणे, बियर, धम्सअप एका दमात घेणे, यासह नानाविविध जीवघेणे प्रयोग करून वाढदिवस साजरे होताना दिसतात. त्यातून अनेक जीवघेण्या घटना घडल्या आहेत. या सर्वाचा कहर ठरणारी घटना ...पान २ वर

## बाराशे रुपयांवरून भांडण पेटले धावत्या बसमधून मित्राला फेकले

जळगाव (मुक्ताईनगर)/क्राईम रिपोर्टर



मयत सिद्धार्थ

**दारुड्या मित्रांच्या मैत्रीचे काही खरे नसते. कारण एकदा का दारूची नशा डोक्यात गेली कि मग माणूस मैत्री वैगेरे विसरून जातो. गोंदिया जिल्ह्याच्या तिरोडा येथील तीन बेरोजगार मित्र नोकरीसाठी सुरतला गेले होते. पण फिजिकल चाचणीत ते अपात्र ठरल्याने खाजगी बस मधून आपल्या घरी निघाले होते. मात्र रात्रीच्या वेळी प्रवास करताना त्यांच्यात बसमध्येच १२०० रुपयांवरून वाद झाला. हा वाद इतका वाढला कि स्वप्नील आणि भरत या दोघांनी त्यांचा तिसरा मित्र सिद्धार्थला धावत्या बसच्या मागच्या खिडकीतून फेकून दिले. यात सिद्धार्थचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



मद्याचे व्यसन आणि शिक्षणाचा अभाव असलेल्या दोघा मित्रांनी त्यांच्या एका मित्राची धावत्या बसच्या खिडकीतून फेकून दिल्याने मृत्यू झाल्याची घटना काही महिन्यापुर्वी जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर पोलिस स्टेशन हद्दीतील महामार्गावर घडली. वरवर हा रस्ता अपघाताचा प्रकार वाटत असला तरी पोलिस निरीक्षक नागेश मोहिते आणि त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांच्या तल्लख बुद्धीने हा खूनाचा प्रकार



आरोपी भरत आरोपी स्वप्नील

उघडकीस आला. सिद्धार्थ विकास बनसोड, स्वप्नील गजराम परिहार आणिभरत चुनिलाल रहांगडाले हे तिघे मित्र होते. तिघेही गोंदीया जिल्ह्यातील रहिवासी होते. तिघे एकमेकांना चांगल्या प्रकारे परिचीत होते. तिघांमधे शिक्षणाचा अभाव होता आणि तिघांना मद्यपानाची सवय जडली होती. मद्याच्या नशेत असले ...पान २ वर

## जागेवरून फेरीवाल्यांत वाद झाला एका विक्रेत्याने दुसऱ्याचा खून केला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर




मयत इम्रान आरोपी युसुफ

**रस्त्यावर माल विकणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये नेहमीच जागेवरून वाद होतात. आपल्या जागेवर दुसऱ्याने धंदा लावू नये असे प्रत्येक फेरीवाल्याला वाटत असते. कोल्हापुराठी तसेच झाले. इम्रान व युसुफ हे तसे मित्र होते. दोघेही फेरीवाले होते. मात्र रस्त्यावर फेरीचा धंदा लावण्यावरून युसुफचे इम्रानच्या आई-वडिलांशी भांडण झाले होते. यावेळी युसुफने इम्रानच्या आई-वडिलांना शिवीगाळ केली. या गोष्टीचा इम्रानला राग आला. त्यामुळे इम्रान युसुफला जाब विचारायला गेला. पण दारूच्या नशेत असलेल्या युसुफने इम्रानवर चाकूचे वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी युसुफला अटक केली आहे.**

कोल्हापूर शहरातील आराम कॉर्नर येथील इम्रान इमामउद्दीन मुजावर याचा कटलरीचा व्यवसाय आहे. त्याचे आई वडिल ही त्याच्या शेजारीच कटलरीचा स्टॉल लावतात. इम्रान याच्या घरची परिस्थीती बेताचीच असल्याने लहान मोठा व्यवसाय करून कसा तरी तो आपला उदरनिर्वाह करीत होते. बऱ्याच वर्षापूर्वी ...पान २ वर

## समाधानला लागला तृतीयपंथीयाचा लळा लग्नाची मागणी करताच आवळला गळा






म्हसवड (माण)/क्राईम रिपोर्टर

**काही लोकांना समलिंगी संबंधाची विकृती असते. मात्र असे संबंध केवळ शरीरसुखापुरते मर्यादित असतात. पण पुरुष असूनही बाईच्या फिलिंग असलेले तृतीयपंथी कधी कधी एखाद्यावर खरोखरच प्रेम करू लागतात. म्हसवड माण परिसरातील राहुल उर्फ राशी हा तृतीयपंथी होता. त्याचे गावातीलच समाधान चव्हाण सोबत लैंगिक संबंध होते. मात्र राशी हळूहळू समाधानवर प्रेम करू लागला आणि त्याला लग्नाची गळ घालू लागला. पण तृतीयपंथी भलेही वासनेची भूक भागवण्यासाठी उपयुक्त असला तरी त्याच्याशी सहसा कुणी लग्न करीत नाही. समाधानाचे सुद्धा तसेच होते. पण नंतर मात्र राशी त्याला घरात घुसण्याची धमकी देऊ लागला. त्यामुळे चिडलेल्या समाधान याने त्याची गळा दाबून हत्या केली व मृतदेह विहिरीत फेकला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

शनिवार दि.१४ सप्टेंबर रोजी मसाईवाडी ते पानवनकडे जाणाऱ्या रस्त्यावरील विजय सिन्हा यांच्या विहिरीत एका महिलेचा मृतदेह पाण्यावर तरंगत असताना काही शेतकऱ्यांना ...पान ६ वर

## शिवीगाळ केल्याने राग अनावर झाला सुपरवायझरचा त्याने शिरच्छेदच केला



ठाणे/क्राईम रिपोर्टर

**काही कर्मचारी असे असतात कि त्यांना वरिष्ठाने दम दिलेला आवडत नाही. अशावेळी रागाच्या भरात त्यांच्या हातून काहीही घडू शकते. ठाण्याच्या कोलशेतमध्ये एका सिक्युरिटी सुपरवायझरने आपल्या हाताखालच्या सुरक्षा रक्षाला शिवीगाळ केली. याचा त्या सुरक्षा रक्षकाला इतका राग आला कि त्याने सुपरवायझरचे शीर धडावेगळे केले. या प्रकरणी आरोपी सुरक्षा रक्षकाला अटक केली आहे.**

कोलशेत येथे एका सिक्युरीटी सुपरवायझरचे शीर छाटून हत्या करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणात आता ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेने इमारतीतील सुरक्षा ...पान २ वर

## मित्रच अखेर मित्राच्या जीवावर उठले पगाराचे पैसे लुटून त्याला दगडाने ठेचले



कोल्हापूर (कागल)/क्राईम रिपोर्टर

**काही मित्र असे असतात जे त्यांच्या मित्राला जेवण देऊ शकतात किंवा दारूही पाजतात, पण उसने पैसे मात्र देत नाहीत. त्यातूनच मैत्रीत दुरावा येतो आणि मित्रच मित्राच्या जीवावर उठतात. कागलमध्ये अशाच एका घटनेत उसने पैसे दिले नाहीत म्हणून एका मित्राने आपल्या साथीदाराच्या मदतीने मित्राला पगाराच्या दिवशीच दारू पाजून अगोदर लुटले, त्याचा पगार काढून घेतला आणि नंतर दगडाने ठेचून त्याची हत्या केली.**

गेल्या दीड वर्षापर्वी मध्यप्रदेशातील माझोली सिधी येथून विकास गोपी सिंग हा कागल येथील पंचतारांकित वसाहतीतील एका कारखान्यात कामाला आला. तो पंचतारांकित वसाहतीत एका भाडयाच्या खोलीत राहयला आहे. त्याची कारखान्यातील आणि बाहेरील लोकांशी ओळख वाढल्याने दारू पिण्याच्या निमित्याने त्याची उठबस त्या लोकाबरोबर होत होती. शनिवार दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळच्या सुमारास वनिकरण विभागात काही शेतकरी जनावरे चारण्यासाठी गेली असता त्यांना मगदुम मळयातील एका झाडाझुडूपात एका तरूणाचा मृतदेह दिसून



आला. त्या मृतदेहाच्या चेहऱ्यावर दगडाने ठेचलेल्या खुणा दिसत होत्या. त्याच्या चेहऱ्याचा चेंदामेंदा झाला असल्याने त्या मृतदेहाची ओळख पटविण्यात पोलीसांना अडचण ...पान ६ वर

23 TO 29 SEPTEMBER 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 9/21/2024 8:07 PM Page 1



पान १ वरून...

## स्वप्नातील मृतदेह खेडच्या भोस्ते...

आपल्या स्वप्नात एक मृतदेह आला आणि तो बोलू लागला एका तरूणाच्या या दाव्यामुळे महाराष्ट्रातील खेडमध्ये मोठी खळबळ माजली होती. त्यानंतर पोलिसांनी शोध घेतला असता खेड तालुक्यातील भोस्ते घाटात एका पुरुषाचा सापळा, कवटी सापडली आणि पोलिसही चक्रावले. मात्र आता या प्रकरणाला वेगळं वळण लागलं आहे. कारण मृतदेह दिसला, तो बोलतोय असा दावा केलेल्या तरूणाचे ते स्वप्न म्हणजे चक्क बनाव असल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी योगेश आर्या (वय ३०, रा, सिंधुदुर्ग) याला खेड पोलिसांनी अटक केली आहे. ज्याचा मृतदेह सापडला ती व्यक्ती आणि योगेश यांचा नेमका संबंध काय, हे शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर असून योगेशच्या चौकशीत अनेक गोष्टींचा खुलासा होईल आणि या मृत्यूचे गूढ संपूर्ण उकलेल अशी अपेक्षा आहे. सिंधुदुर्गातील सावंतवाडीत राहणाऱ्या योगेश या तरुणाला दोन दिवसांपूर्वी (१७ सप्टेंबर) स्वप्नात एक मृतदेह दिसला होता. माझ्या स्वप्नात एक मृतदेह आलाय, तो माझ्याशी बोलतोय असा त्याचा दावा होता. त्यानंतर योगेशने खेड पोलीस स्टेशन गाठलं. खेड रेल्वे स्टेशनसमोर एका डोंगरात पुरुषाचा मृतदेह आहे. तो माझ्या स्वप्नात येऊन आम्हाला मदत करा, असे सांगत आहे' असे योगेशने पोलिसांना सांगितलं. त्याचं बोलणं ऐकून पोलिस चक्रावले, सुरूवातील कोणी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही पण तो त्याच्या बोलण्यावर ठाम होता. अखेर पोलिसांनी तेथे जाऊन त्या भागाची पाहणी केली. त्यावेळी भोस्ते घाटातील जंगलात एका झाडाजवळ कुजल्याचा वास येत होता. पोलिसांनी जवळ तपासले असता, एका आंब्याच्या झाडाच्या फांदीला काळ्या रंगाची वायर व प्लास्टिकच्या पट्ट्या बांधून त्याला टॉवेलने गळफास घेतलेल्या अनोळखी व्यक्तीचा मृतदेह खाली पडलेला दिसला. राखाडी रंगाचे जॅकेट, राखाडी रंगाची पँट अशा कपड्यांच्या आत मानवी हाडे असल्याचे दिसून आले. या मृतदेहाच्या पायाजवळच काळ्या रंगाची एक सॅक होती, तसेच काही अंतरावर एक कवटीही पडलेली दिसली. मृतदेहाच्या दोन्ही ढोपराजवळ काळ्या रंगाचे बूट होते. मृतदेहाची अवस्था पाहून ही घटना खूप दिवसांपूर्वी घडली असावी असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. मात्र तेथे सापडलेल्या सॅकमध्ये कोणतेही पुरावे नव्हते, ओळखपत्रही नव्हते, त्यामुळे हा मृतदेह कोणाचा, ही आत्महत्या आहे की घातपात याचा पोलिस तपास करत होते. स्थानिकांपैकी कोणालाही या मृतदेहाबद्दल काही कळू नये, पण एका इसमाच्या स्वप्नात मृतदेह यावा, तो आपल्याशी बोलला, असा दावाा तरूणाने करावा, हे पोलिसांना संशयास्पद वाटलं. त्यांनी त्यादृष्टीनेही तपास केला. स्वप्न खरं ठरला असा दावा करण्यात आल्याने पोलिसांची झोप उडाली होती. मात्र अथक तपासानंतर हे स्वप्न वगैरे बनाव असल्याचे उघड झाले. सिंधुदुर्गात राहणाऱ्या माणसाला खेडमधल्या डोंगरातला मृतदेह स्वप्नात कसा दिसतो, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खेड मधील या घटनेचा तपास करण्यासाठी पोलिसांचे एक पथक गोव्यामध्ये देखील रवाना झाले आहे. त्यानंतर योगेशचा शोध घेण्यासाठी पोलिसांची शोधमोहीम सुरू होती. अखेर त्याला ताब्यात घेण्यात आले व आज अटक करण्यात आली. योगशने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर काही व्हिडीओ शेअर केले होते, त्यावरून पोलिसांना संशय आला. अखेर खेड पोलिसांनी तपास करून, योगेशला अटक केली. मृत व्यक्ती आणि योगेश यांचा नेमका संबंध काय हे शोधण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे. पुढील तपासानंतरच या खुनाला वाचा फुटेल.

## कुटुंबाला त्रास देऊ लागताच थोरल्याचे...

नसे. त्यामुळे घरचे लोक वैतागले होते. याच वैतागातून मोठाभाऊ आकाशने टोकाचा निर्णय घेतला आणि शिवमला धरणाच्या पाण्यात ढकलून त्याची हत्या केली. विक्रमगड तालुक्यातील सजन गावच्या हद्दीत धरणामध्ये अनोळखी इसमाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला होता. अज्ञात मारेकऱ्यांनी पुरावा सोडला नसताना विक्रमगड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने मृताचा मोठा भाऊ आकाश वसंत लोहार (वय २८) याला हत्याप्रकरणी अटक करण्यात यश मिळविले. आरोपी आकाश लोहार (मूळ रा.वारलीपाडा, ता.विक्रमगड) हा व्यवसायानिमित्त वसई तालुक्यात राहतो. त्याचा लहान भाऊ शिवम लोहार (१९) याला दारूचे व्यसन होते. काम आणि दारू पिण्यासाठी पैसे मिळत नसल्याने तो चोऱ्या करीत होता. पैसे न मिळाल्यास तो आई-वडिलांसह सर्वांना मारहाण करीत होता. याला कंटाळून त्याचा मोठा भाऊ आकाशने १ सप्टेंबरला शिवमला रिक्षात बसवून दारू पाजली. त्याला सोबत घेऊन तो सजनपाडा येथील धरणावर गेला. तेथे त्याला दारू पाजून मद्यधुंद अवस्थेत पडलेला असताना नायलॉनच्या दोरीने त्याचा गळा आवळला. त्याचा मृत्यू झाल्यानंतर मोठे दगड त्याने भावाच्या शरीराभोवती दोरीने बांधून त्याला धरणाच्या पाण्यात ढकलून दिले. मृताची ओळख पटू नये म्हणून पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपीने त्याच्या अंगावरील कपडे आणि हातातल्या वस्तूही काढून टाकल्या. काही दिवसांनंतर धरणाच्या पाण्यावर एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह तरंगत असल्याची माहिती विक्रमगड पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करीत पुढील तपास सुरू केला. जव्हारचे उपविभागीय पोलिस अधिकारी गणपत पिंगळे यांनी सपोनि रवींद्र पारखेसह स्थानिक गुन्हे शाखेने याप्रकरणी तपास सुरू केल्यावर सजनगावच्या रस्त्यावर एक रिक्षा धरणाकडे जात असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसून आले. रिक्षाच्या मालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखविल्यावर कुटुंबाला त्रास होत असल्याने हे पाऊल उचलल्याचे त्याने पोलिसांना सांगितले.

## शरीरसुख घेताना मुलीला रंगेहात...

नातेवाईकांना या प्रकाराची माहिती दिली. नातेवाईकांनी भारती झोरे आणि तिचा प्रियकर संतोष नांदगावकर विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेऊन प्रेमी युगुलाविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणी पोलीस निरीक्षक सचिन पवार अधिक तपास करत आहेत.

## सर्पमित्राने अंगावर साप टाकला...

बुलढाणा जिल्ह्यात घडली. मित्राच्या भावाच्या वाढदिवसाला जमलेल्या तिघा मित्रांपैकी सर्पमित्र असलेल्या मित्राने दुसऱ्या मित्राच्या हातात विषारी साप देऊन फोटो काढण्याचा प्रयत्न केला. यामध्ये सापाने चावा घेतल्याने मित्राचा नाहक बळी गेला. या घटनेने समाजातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. चिखली शहरातील गजानननगर भागात देविदास विठोबा जगदाळे हे ७५ वर्षीय वृध्द राहतात. त्यांना चार मुले आहेत, त्यापैकी संतोष हा ३१ वर्षीय तरूण असून तो वृध्द आजीकडे रहात असे. संतोष हा मिस्त्री काम करायचा. कष्टाळू असलेल्या अविवाहित संतोषचे घराजवळच असणारे दोन जिवलग मित्र होते, आरिफ खान आणि धीरज पंडितकार. या तिघांचे नेहमी उठणे-बसणे एकत्र होते. ते सुखदुःख एकमेकांना सांगत होते. नेहमीच एकमेकांच्या सोबत राहणारे. त्या तिघांची मैत्री सर्वश्रुत होती. आरिफ खान हा चिखली शहरांमध्ये सर्पमित्र म्हणून प्रसिद्ध होता. कोणताही साप तो शिताफीने पकडत होता. साप पकडण्यात हुशार असलेल्या आरिफचे वर्तन कमालीचे बेजबाबदार होते. तो सापासोबत वेगळेच स्टंट करत असे. वास्तविक हे बेकायदेशीर असले तरी तो तसे वागत होता. दि. ५ जुलै रोजी धीरज पंडितकरचा भाऊ अभय याचा वाढदिवस होता. संध्याकाळी सातच्या दरम्यान संतोष कामावरून घरी परत आला. तो घरी पोहचताच त्याचे मित्र धीरज पंडितकर, आरिफ खान दोघेही घरी आले. अभयच्या वाढदिवसाला जायचे असल्याचे सांगून त्या दोघांनी संतोषला सोबत घेतले. ते तिघे जण आरिफच्या सर्पमित्र लिहिलेल्या मोटरसायकलवर बसून निघाले. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ते पोहचले. तिथे अभयच्या वाढदिवसाचे सेलिब्रेशन सुरू झाले. केक कापला, एकमेकांना भरवला, आरडाओरड आणि मस्करी सुरू होती. तेव्हा आरिफ याने काही वेळापूर्वी पकडलेला विषारी साप एका प्लास्टिक बरणीत होता. ती बरणी त्याच्यासोबतच होती. त्याने बरणीतून आणलेला विषारी साप बाहेर काढला. तो विषारी सर्प मित्रांच्या हातात देऊन फोटो काढण्याचा जीवघेणा स्टंट तो करू लागला. काहीवेळाने त्याने संतोषच्या हातातही साप देण्याचा प्रयत्न केला, मात्र संतोष सापाला भित असल्याने त्याने साप हातात घेण्यास नकार दिला. अरिफ खान त्याला साप हाती घेण्यास जबरदस्ती करत होता. संतोष साप हाती घेत नसल्याचे पाहताच अरिफने त्याचे दिशेने साप सरकवला. संतोषने साप हाती घेण्याचा प्रयत्न केला असता, त्याच्या उजव्या हाताच्या करंगळीजवळील बोटाला सापाने चावा घेतला. सापाने चावा घेताच संतोष गर्भगळीत झाला. रात्रीचे ११ वाजले होते. आरिफ व धीरज यांनी संतोष यास चिखली शहरातील एका खाजगी दवाखान्यात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून एक इंजेक्शन व काही मेडिकल आणण्यास धीरज व आरिफला सांगितले. डॉक्टरांनी लिहून दिलेले इंजेक्शन व मेडिकल महाग होते. दोघांजवळ पैसे नव्हते. घरी जाऊन कोण पैसे आणणार आणि कोण खर्च करणार हा प्रश्नच होता. त्यामुळे तेथील डॉक्टरांना आम्ही सरकारी दवाखान्यात जातो, असे म्हणून त्यांनी सुट्टी घेतली. पण सरकारी दवाखान्यात न जाता ते सरळ दुचाकीने संतोषला घेऊन ते घराकडे निघाले. वेळ जात होती, तशी संतोषची प्रकृती गंभीर होत होती. रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान ते गजानन नगरमध्ये पोहचले. संतोषच्या घरी याबाबत काहीही सांगण्याचासाधा प्रयत्न त्यांनी केला नाही. उपचार न मिळाल्याने संतोष हा गजानन नगरच्या एका चौकात रस्त्यावर अचानक कोसळला. तो उठलाच नाही. क्षणात संतोषचा तडफडून मृत्यू झाला. स्वतःला संतोषचे मित्र म्हणवणाऱ्या आरिफ आणि धीरजने शत्रुलाही लाज वाटेल असे कृत्य करत तेथून पळ काढला. दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ जुलै रोजी सकाळी सहा वाजता चिखली शहरातील गजानन नगर भागातील नागरिक कुजबूज करत होते. चौकात संतोष जगदाळे पडलेला होता. त्याची कोणतीच हालचाल नसल्याने संतोषचा मृत्यू झाला असल्याचा अंदाज त्याला पाहणाऱ्यांनी बांधला. संतोष रस्त्यावर पडल्याचे त्याच्या घरी कळविण्यात आले. त्वरित त्याच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. संतोषची हालचाल नव्हती. त्याचे शरीर काळेनिळे पडले होते. तरी संतोषला स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले. उपस्थित वैद्यकीय अधिकारी यांनी संतोषला तपासून मृत घोषित केले. तरुण मुलाचा मृत्यू झाल्याने देविदास जगदाळे यांच्यावर आभाळ कोसळले. संतोषचा मृत्यू झाल्याची खबर वाऱ्यासारखी चिखली शहरात पसरली. दरम्यान रात्री वाढदिवसाच्या दरम्यान घडलेला प्रकार कानोकानी झाला होता. संतोषवर अंत्यसंस्कार झाल्यावर त्याचे वडील देविदास विठोबा जगदाळे यांनी चिखली पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून चिखली पोलिसांनी संशयित आरोपी आरिफ खान रहीस खान आणि धीरज पंडितकर या दोघांविरोधात अपक्र ५१३/२४ कलम १०५, ३ (५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल केला. घटना घडली तेव्हापासूनच दोघांनीही शहरातून पोबारा केला होता. संशयित आरोपी धीरज पंडितकार यास न्यायालयाने अटकपूर्व जमीन मंजूर केला तर अरिफ खान हा अजूनही फरार आहे. वाढदिवसाच्या धुंदीत बेधुंद असलेल्या तरुणांनी आपल्या एका मित्राचा स्टंटमध्ये बळी घेतला. न्यायदेवता दोघांनाही काय सजा देईल ते येणाऱ्या काळात समजेल मात्र वाढदिवस सेलिब्रेशन करताना आई- वडिलांसाठी, पालकांसाठी आणि तरुणाईसाठी आता वेगळा धडा घेण्याची गरज नाही. मित्राचा वाढदिवस साजरा करताना आपण केलेले कृत्य कोणाच्यातरी जीवावर बेतू शकते, याचा विचार नक्कीच करावा. आई-वडिलांनी, पालकांनीही आपल्या मुलास मार्गदर्शन करण्याची गरज आहेच अन्यथा कोणाच्यातरी वाढदिवसाला असेच संतोषसारखे बळी जात राहतील यात शंका नाही. या घटनेचा तपास चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार संग्राम पाटील यांचे मार्गदर्शनात पोउपनिरी भगवतकर करत आहेत.

## बाराशे रुपयांवरून भांडण पेटले...

म्हणजे तिघे एकमेकांना शिवीगाळ व मारहाण करत असत. सिद्धार्थ विकास बनसोड, स्वप्नील गजराम परिहार आणिभरत चुनिलाल रहांगडाले हे तिघे गोंदीया जिल्ह्यातील बेरोजगार तरुण मित्र सुरत येथे नोकरी मिळवण्यासाठी सोबत गेले होते. त्या ठिकाणी तिघांची वैद्यकीय चाचणी झाली. या चाचणीत तिघे मद्यपी मित्र एकाचवेळी फेल झाले. त्यामुळे तिघांवर आपापल्या गावी गोंदीया जिल्ह्यात परत जाण्याची वेळ आली. तिघांकडे परतीच्या प्रवासासाठी पुरेसे पैसे नव्हते. त्यामुळे ठेकेदार कंपनीने तिघांना परतीचा प्रवास व इतर खर्चासाठी रोख बाराशे रुपये दिले. मोजक्या पैशात तिघे मित्र आपापल्या गावी नागपूरला जाणाऱ्या लक्झरी बसने जाण्यास निघाले. दोन सिटवर दाटीने तिघे बसून प्रवास करु लागले. ५ जुलैच्या रात्रीच्या अंधारात प्रवासादरम्यान बाराशे रुपयांच्या वाटणीवरुन तिघांमधे वाद सुरु झाले.बघता बघता हा वाद पराकोटीला गेला. सिद्धार्थ बनसोड हा त्याचे साथीदार स्वप्नील परिहार आणि भरत रहांगडाले या दोघांना शिवीगाळ करु लागला. स्वप्निल आणि भरत हे दोघेही त्याला अर्वाच्च भाषेत बोलत होते. ते प्रवास करत असलेली बस जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर परिसरातून जाणाऱ्या महामार्गावरुन धावत होती. त्यावेळी त्यांचा वाद शिगेला पोहोचला होता. मुक्ताईनगर पोलिस स्टेशन हद्दीतील चंद्रोदय पेट्रोल पंप नजीक संतापाच्या भरात स्वप्निल आणि भरत या दोघांनी सिद्धार्थ यास धावत्या बसच्या खिडकीतून बाहेर फेकून दिले. रात्रीची वेळ होती. सर्व प्रवासी झोपेच्या अधिन गेले होते. या बसच्या चालक कॅबीनचा दरवाजा व खिडक्या प्लायवूडच्या स्लायडींग स्वरुपातील होत्या. त्यामुळे चालक, वाहकाला देखील आपल्या बसमधून कुणी बाहेर फेकला गेल्याचा आवाज आला नाही. यावेळी मागच्या बाजूने कोणतेही वाहन येत नव्हते. त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनाच्या लाईटाचा प्रकाशझोत घटनेच्या वेळी पडला नाही. एकंदरीत अंधाराच्या साम्राज्यात सिद्धार्थ बाहेर फेकला गेला. डोक्यावर आपटला गेल्याने त्याचा काही वेळाने मृत्यू झाला. दरम्यान पहाटेच्या अंधारात पितांबर अरुण गुरव या जागरुक नागरिकास सिद्धार्थ बनसोड या तरुणाचा मृतदेह महामार्गावर आढळून आला. मयत सिद्धार्थ बनसोड हा पितांबर गुरव यांच्यासाठी अनोळखी होता. त्यांनी या घटनेची माहिती हरताळा येथील पोलिस पाटील सौ. स्नेहल प्रदिप काळे यांना फोनद्वारे कळवली. त्यामुळे सौ. स्नेहल काळे यांनी आपल्या पतीसह घटनास्थळी जावून खात्री केली. घटनास्थळावर मयत अवस्थेत पडलेल्या तसेच लोकांच्या दृष्टीने अनोळखी इसमाच्या डोक्याला जबर मार लागलेला होता. दरम्यानच्या कालावधीत एका ट्रकचालकाने मलकापूर हद्दीतील दसरखेडा एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली की कुणीतरी अज्ञात व्यक्ती कोणत्यातरी लक्झरी बसमधून महामार्गावर पडला असून तो मयत झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच मुक्ताईनगर पोलिस स्टेशनचे पो.नि. नागेश मोहिते व त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक राहुल प्रशांत बोरकर, पो.ना. संदीप वानखेडे, पो.कॉ. निखील नारखेडे, पो. कॉ. मुकेश महाजन, ईश्वर पाटील, गौरव पाटील आदींनी घटनास्थळ गाठत पुढील कारवाई व तपासाला सुरुवात केली. मयत सिद्धार्थ हा घटनास्थळावर जमलेल्या नागरिकांसह पोलिसांसाठी अनोळखी होता. त्याला कुणीही ओळखत नव्हते. त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीकामी मुक्ताईनगर उप जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आला. या घटनेप्रकरणी पोलिस पाटील स्नेहल काळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मुक्ताईनगर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. अज्ञात व्यक्तीच्या मृत्यूप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गु.र.न. २४५/२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०६ (२), २८१, मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १३४ (ब), १८४ नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान मयत हा त्याने परिधान केलेल्या कपड्यावरुन भिकारी वाटत नव्हता. त्याच्या खिशात कोणतेही ओळखपत्र नव्हते. त्याच्या एकंदरीत पेहरावावरुन आणि केवळ डोक्याला झालेल्या जखमांवरुन हा अपघाताचा नव्हे तर घातपाताचा प्रकार असल्याचा संशय पोलिस निरीक्षक नागेश मोहिते आणि त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांना आला. त्यांनी त्या दृष्टीने पुढील तपासाला सुरुवात केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांच्याकडे देण्यात आला. तपासाधिकारी पोलिस उपनिरीक्षक राहुल बोरकर यांनी दसरखेडा टोल नाक्यावर जाऊन येणा-याजाणाऱ्या लक्झरी बसेससह ट्रकचा तपशील संकलीत केला. कोणत्या वेळेला किती आणि कोणत्या क्रमांकाचे ट्रक,लक्झरी बसेसरवाना झाल्या याची देखील माहिती त्यांनीसंकलीत केली. टोलनाक्यावरुन सर्व माहितीचा तपशील घेतल्यानंतर एमएच १८ एम ३३९७ या ट्रकवरील चालकाने दसरखेडा पोलिसांना या घटनेची माहिती दिल्याचे निष्पन्न झाले. मुक्ताईनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीतून हाट्रक किती वाजता मलकापूरकडे रवाना झाला असेल या दृष्टिकोनातून पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांनी पुढील तपासाला दिशा दिली. या कालावधीतील सीसीटीव्ही फुटेज संकलीत करण्यात आले. जवळपास सत्तर लक्झरी बसेसची ये-जा या कालावधीत झाली असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यातील नागपूरच्या दिशेने रवाना झालेल्या लक्झरी बसेसची माहिती घेत त्यातील तीन बसेसवर संशय व्यक्त करण्यात आला. या तिन्ही लक्झरी बसेस मधील नोंद असलेल्या प्रवाशांची माहिती घेण्यात आली. या लक्झरी बसेस कोणत्या हॉटेलवर अथवा ढाब्यांवर थांबल्या होत्या याची देखीलमाहिती घेण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजमधे या सिट क्रमांकावरील तिघे आढळून आले. थक्क करणाऱ्या या तपासातील माहितीच्या आधारे या लक्झरी बसमधील स्वप्निल गजराम परिहार (रा. बोदा ता. तिरोडा, जि. गोंदिया) या प्रवाशाच्या भ्रमणध्वनीवरुन या बसचे तिकीट नागपूर पर्यत बुक झाल्याचे निष्पन्न झाले. या माहितीच्या आधारे मुक्ताईनगर पोलिसांचे एक पथक तातडीने गोंदीया जिल्ह्यातील तिरोडा या गावी पोहोचले. तिरोडा या गावातील सहा गावांची माहिती घेतली असता त्यातील बोदा येथील रहिवासी असलेल्या स्वप्निल परिहारया तरुणाचा शोध लागला. त्याच्याकडून मिळालेल्यामाहितीनुसारत्याचा साथीदार भरत चुनीलाल रहांगडाले (रा. भजेपार ता. तिरोडा) याचे नाव पुढे आले. त्यामुळे त्याला देखील पोलिस पथकाने ताब्यात घेतले. दोघांनी पोलिसी खाक्या बघून आपण दोघांनीच सिद्धार्थ विकास बनसोड (रा. गोंडवाडी ता. तिरोडा) याला सीट क्रमांक ९ व १० च्या खिडकीतून धावत्या लक्झरी बसमधून फेकून दिल्याची कबुली दिली. प्रवासादरम्यान मयत सिद्धार्थ हा वेड्यासारखा अंगावर धावून येत मद्याच्या नशेत पैशांची मागणी करत होता. त्यामुळे रागाच्या भरात त्याला दोघा मद्यपी मित्रांनी बसच्या खिडकीतून फेकून दिल्याची कबुली दिली. दोघांना अटक करण्यात आली. अटकेतील दोघांना मुक्ताईनगर पोलिस स्टेशनला आणण्यात आले. दोघांना पो.नि. नागेश मोहिते यांच्यासमक्ष हजर करण्यात आले. अशा प्रकारे हा रस्ता अपघात नसून घातपाताचा प्रकार असल्याचे पो.नि. नागेश मोहिते आणि पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांच्या चाणाक्ष बुद्धीने तेरा दिवसात उघड केले.

## जागेवरून फेरीवाल्यांत वाद झाला...

तो आणि त्याचे आई वडिल परराज्यातून कोल्हापूरात व्यवसाय करून पोटा पाण्यासाठी आले होते. आज इम्रान याचे आई वडिल वयोवृध्द झाले तरी ते ही आपला स्वतंत्र व्यवसाय करीत होते. तर इम्रान ही त्याचेबरोबर आपला कटलरीचा स्वंत्रय व्यवसाय करीत होता. या व्यवसायावर कसा बसा आपल्या संसाराचा गाडा चालवित होता. इम्रान याच्या शेजारीच आराम कॉर्नर येथे राहणारा युसूफ हमीद अलमजीत हा आपला पर्स विकण्याचा स्टॉल लावीत होता. त्याचा पर्स विकण्याचा स्टॉल हा त्याची पत्नी सांभाळत होती. इम्रान आणि युसूफ हे दोघे ही जाजी भाई असल्याने दोघात सहसा कधी वाद विवाद भांडण तंटा होत नव्हता. कारण इम्रान याचा कटलरीचा तर युसूफ याचा पर्स विकण्याचा व्यवसाय असल्याने त्या दोघात प्रतिस्पर्धा ही नव्हतीच. दोघे ही रस्त्याला मोठा स्टॉल लावीत असल्याने दोघांचा ही धंदा मोठा होत होता. सणासुद्दीच्या दिवसात तर त्याच्या धंदयाला मरण नव्हते. रोज पाच दहा हजाराचा धंदा हा ठरलेला असायचा. त्यामुळे दोघांची ही कुटूंबे दुकाने उघडण्या आधीच रस्त्यावर आगळ पगळ जागा धरून आपला स्टॉल लावत होते. त्याच्या स्टॉलमुळे आतील दुकानदार लोकांना त्रास हा होत होता. त्या दुकानात जाण्या इतपत ही ते दोघे रस्ता सोडत नव्हते. म्हणून दुकानदार लोक त्यांना बसू देत नव्हते.तरी ही इम्रान आणि युसूफ हे दोघे ही हेकेखोरपणे आपला स्टॉल रस्त्यावर मांडून धंदा करीत होते. त्यातच गणेश चतुर्थी असल्याने रस्त्यावर मोठी गर्दी होत असल्याने महानगरपालिकेचे कर्मचारी लोक रस्त्यावरील व्यापाऱ्यांना आपआपला स्टॉल आतमध्ये घेण्यास सांगून जायचे परिणामी जागेचा प्रश्न निर्माण व्हायचा, दोघांचे ही स्टॉल मोठे असल्याने कुणी इकडे तिकडे सरकायला ही तयार होत नसत. त्यातून त्या जागेसाठी अलिकडे त्याचेत भांडणे होऊ लागली होती. युसूफ हा तापट आणि भांडखोर होता. त्याला कुणी काही बोललेले सहन होत नव्हते. त्यामुळे भांडणात तो कोणाला ही धमकी आणि मारहाण करायला ही मागे पुढे पाहत नव्हता. जागेची रोजची कटकट मिटविण्यासाठी काही जण रात्री जाताना त्या जागेवर दगड किंवा पोते टाकून जातात. तसा प्रकार युसूफ आणि इम्रानचे आई-वडिल ही करीत होते. ज्यांना त्यांना आपआपल्या धंदयाची काळजी होती. रविवार दि.१५ सप्टेंबर रोजी रात्री जाताना इम्रानच्या आई वडिलांनी जाताना आपल्या जागेवर पोते टाकून गेले होते. सोमवारी सकाळी इम्रानचे आई वडिल आपला कटलरीचा स्टॉल लावायला आल्यानंतर त्यांना त्याच्या जागेवरून त्यांनी रात्री टाकून गेलेले पोते दिसले नाही तरी ही ते नेहमी प्रमाणे आपल्या जागेवर कटलरीचा स्टॉल लावत असताना सकाळ सकाळी युसूफची बायको आपला पर्सचा स्टॉल लावण्यासाठी आपल्या जागेजवळ आली. त्यावेळी इम्रानचे आई वडिल हे आपल्या जागेवर स्टॉल लावीत असल्याचे दिसले. तिने याबाबत इम्रानच्या आई वडिलांना विचारले असता त्यांनी आम्ही आमच्या जागेत स्टॉल लावीत आहोत. तु तुझ्या जागेवर स्टॉल लाव असे सांगितले. ती त्यांना म्हणत होती माझी जागा आहे. तुम्ही जरा बाजुला घ्या. या कारणातून त्याचेत वादावादी सुरू झाली. या दरम्यान जागेवरून भांडणे होत असताना युसूफ हा तेथे आला.तो आपल्या बायकोची बाजू घेऊन इम्रानच्या आई वडिलांना बोलू लागला. तो त्याच्या बरोबर भांडत असताना त्याच्या अंगावर त्यांना मारायला जात अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. काही वेळाने त्याचे भांडण शांत झाले. दोघे ही आपआपल्या व्यापारात लागले. सकाळी युसुफच्या बायकोबरोबर झालेली भांडणे आणि युसूफने केलेली शिवीगाळ हे इम्रानच्या आई वडिलांनी इम्रानला सांगितले होते. युसूफने आपल्या आई वडिलांना केलेली शिवीगाळ इम्रानच्या जीवावर लागलेली होती. इम्रानची बहिण, भावोजी, इम्रानची बायको आणि इम्रान यांनी सोमवारी रात्री युसुफ आणि त्याच्या बायकोबरोबर भांडणे काढून त्याने आई वडिलांना केलेल्या शिवीगाळीचा जाब विचारला. त्यावेळी काही जणांनी मध्यस्थी करीत त्याचे भांडण मिटवले होते.इम्रान आणि त्याच्या बहिणीने आपल्याला जाब का विचारला याचा राग युसुफ याला आला.तो रात्री थोडा दारुच्या नशेत असल्याने त्याला त्याच्या बायकोने आणि घरच्या लोकांनी शांत बसविले होते.परंतु त्याच्या डोक्यातून राग काही गेलेला नव्हता. मंगळवार दि.१७ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन मिरवणुक असल्याने या दिवशी धंदा हा मोठा होत असतो हे युसूफ आणि इम्रान यांना माहित होते. त्यांनी सकाळीच लवकर आपआपले स्टॉल लावलेले होते. रात्रीची धुसफुस अजून युसूफच्या मनात होती.तो इम्रानवर चिडून होता. आज दिवसभर त्याने फुल्ल दारू प्यायलेली होती. दारूच्या नशेत तो इम्रानसमोर येऊन त्याला बघून घेण्याची भाषा करीत होता. इम्रान ही सर्तक होता.युसूफने काल रात्री आपल्या आई वडिलांना केलेली शिवीगाळ तो विसरला नव्हता. तो ही रागाच्या भरात होता. सायंकाळी ५ वाजणेच्या दरम्यान इम्रानच्या स्टॉलवर त्याची बहिणी, बहिणीचा नवरा अन्य नातेवाईक आले. त्यांना बघून युसूफ जास्तच चवताळला होता. सायंकाळी ग्राहकांची ही गर्दी होत होती. कोणाला कोणाकडे ली दयायला ही वेळ नव्हता. रात्री ८ वाजणेच्या दरम्यान इम्रान ही दारू पिऊन आला तो काल रात्रीचा जाब विचारण्यासाठी युसूफकडे गेला. युसूफ ही दारूच्या नशेत असलयाने इम्रान जाब विचारत असताना त्याने त्याला आपल्यात काही भांडण नाही असे दाखवित त्याने त्याला मिठी मारली त्याला बाजुला नेत त्याच्या छातीवर युसूफने बोलता बोलता चाकूने सपासप वार केले. त्याने केलेला चाकूचा वार थेट इम्रानच्या ह्दयाजवळ बसला. युसूफने अचानक केलेल्या हल्ल्याने इम्राने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान युसुफने त्याच्या दंडावर चाकुने दुसरा वार केला. तरीही इम्रान हा त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत ओरडत होता. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने बाजुलाच थांबलेले इम्रानचे नातेवाईक बहिण, बहिणीचा नवरा त्याला सोडवायला आले. त्यांनी त्या दोघांचे भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. आजुबाजुचे लोक ही जमा झाले. परंतु इम्रानच्या छातीवर आणि दंडावर चाकूचे वार झाल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. इम्रानच्या नातेवाईकांनी क्षणांचा ही विंलब न लावता त्याला उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात आणले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असतानाच काही वेळातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती कुणी तरी जुना राजवाडा पोलीसांना कळवली. ऐन सणासुद्दीत आणि गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दरम्यान खूनाची घटना घडल्याने पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत इम्रान याच्या नातेवाईकाकडून घेतली. त्यांनी दिलेल्या माहिती वरून पोलीसांनी संशयीत म्हणून आराम कॉर्नर आझाद कॉलनी कोल्हापूर येथून युसुफ आलमजीत याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता. सुरूवातीला तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत इम्रान मुजावर याच्या बहिणीचा नवरा सोहेल शब्बीर मुजावर याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार इम्रान इमामउद्दीन मुजावर(वय ३८) याच्या खून प्रकरणी युसुफ हमीद आलमजीत(वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३,(१) प्रमाणे जुना राजवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी त्याला मा. कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास जुना राजवाडा पोलीस करीत आहेत. किरकोळ वाद विकोपाला गेला की,त्यातून खुन्नस निर्माण होते आणि त्यातूनच खूनाची घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## शिवीगाळ केल्याने राग अनावर झाला...

रक्षकाला अटक केली आहे. प्रसाद कदम असे आरोपीचे नाव असून सुपरवायझरने शिवीगाळ केल्याने त्याने हे कृत्य केल्याचे तपासात समोर आले आहे. त्याचे मानसिक संतुलनही सुस्थितीत नसल्याचे तपासात समोर आले आहे. कोलशेत येथे एक शॉपिंग कॉम्प्लेक्स आहे. सोमवारी पहाटे या इमारतीच्या गच्चीवर सफाई कर्मचारी गेले असता, सिक्युरिटी सुपरवायझर सोमनाथ देबनाथ यांचा मृतदेह आढळून आला होता. त्यांचे शीर धडावेगळे झाले होते. तसेच त्यांच्या डोक्यावर, चेहऱ्यावर, मानेवर आणि पाठीवर ठिकठिकाणी शस्त्राने वार करण्यात आले होते. या घटेनंतर संपूर्ण शहरात खळबळ उडाली होती. तसेच समाजमाध्यमावर त्यांच्या मृतदेहाचे चित्रीकरण प्रसारित झाले होते. त्यामुळे कोलशेत भागात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या हत्येप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तर याप्रकरणाचा समांतर तपास ठाणे गुन्हे अन्वेषण शाखा युनीट पाच (वागळे इस्टेट) कडून सुरू होता.

पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला होता. त्यावेळी इमारतीतील सुरक्षा रक्षक प्रसाद कदम हा सोमनाथ यांच्यासोबत उद्वाहकामध्ये जात असल्याचे आढळून आले होते. तर परतताना कदम एकटाच होता. त्यामुळे हत्या त्यानेच केल्याचे निष्पन्न झाले. युनीट पाचचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांच्या पथकाने अखेर कदम याचा शोध घेऊन त्याला अटक केली. सोमनाथ याने प्रसाद याला शिवीगाळ केली होती. तसेच त्यांच्यामध्ये यापूर्वीही वाद झाले होते. सोमनाथ याने शिवीगाळ केल्याने त्याची धारदार शस्त्राने हत्या केल्याची कबूली प्रसाद याने दिली आहे. प्रसाद याचे मानसिक संतुलन सुस्थितीत नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. प्रसाद याची सखोल चौकशी पोलिसांकडून सुरू आहे.

# भिवंडीत गणेश विसर्जन मिरवणुकीला गालबोट

## वंजारपट्टी नाका येथे दगडफेक, काही काळ परिसरात तणाव

**भिवंडी/प्रतिनिधी**



संपूर्ण राज्यभरात गणेशोत्सव शांततेत पार पडत असताना मंगळवारी विसर्जन दुपारी तीन वाजता पासून भिवंडी शहरात शांततेत सुरू झाली होती. त्यानंतर रात्री साडे बारा वाजताच्या सुमारास गणेश विसर्जन मिरवणुकी मधील गणेश मूर्ती असलेली वाहन वंजार पट्टी नाका परिसरात आल्या असता सुंदर बेणी कंपाऊंड घुंगट नगर येथील श्री हनुमान मित्र मंडळाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीवर अज्ञात व्यक्तीने दगडफेक केल्याच्या घटनेनंतर या संपूर्ण परिसरात मोठ्या तणाव निर्माण झाला. गणेश भक्तांनी रस्त्यातच बसून जोरदार घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी शहरात पसरल्या नंतर आमदार महेश चौघुले, आर.एस.एस.चे राजेश कुंटे, बजरंग दलाचे संदीप भगत, दादा गोसावी यांसह अनेक हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी काही जणांना जमावा कडून मारहाण झाल्याची घटना घडली. घटनेची दखल घेत सह पोलिस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त पोलीस आयुक्त पंजाबराव उगले, विनायक देशमुख, पोलिस उपायुक्त श्रीकांत परोपकारी, पराग म्हणेरा यांसह मोठ्या संख्येने पोलिस अधिकारी अतिरिक्त पोलीस व दंगल नियंत्रण पथकासह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी तणाव अजून वाढल्याने जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. यामध्ये काही नागरीक जखमी झाले तर जमावा कडून झालेल्या दगड फेकीत एक पोलिस सुध्दा जखमी झाला आहे. या घटनेनंतर शहरात पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे अशी माहिती सह पोलिस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांनी दिली आहे.

दरम्यान पहाटे पर्यतच्या या घटनाक्रमा मुळे परिसरात तणावपूर्ण शांतता होती. पण सकाळ नंतर परिस्थिती सामान्य झाली आहे. येथील जनजीवन सुरळीत सुरू असून आज याच ठिकाणहुन मुस्लिम धर्मियांच्या ईद ए मिलाद उन नबी सणानिमित्त भव्य मिरवणूक निघणार आहे .त्यासाठी मोठा पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

# आरटीओ कर्मचारी येत्या मंगळवारपासून बेमुदत संपावर; वाहन मालक अस्वस्थ!

**कल्याण/प्रतिनिधी**

अनेक वर्षाच्या आपल्या प्रलंबित विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे ६६ वर्ष नेतृत्व करणाऱ्या मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून (ता.२४) बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. बेमुदत संपावर जाण्याची नोटीस परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांना मोटार वाहन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, पवबा कणखर, दीपक गांगुर्डे यांनी दिली. परिवहन आयुक्तांनी तातडीने सहकारी अधिकाऱ्यांसह कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर गुरूवारी चर्चा केली. या चर्चेत नेहमीप्रमाणे कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींना कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षाच्या प्रलंबित मागण्यांवर अधिकाऱ्यांनी पोकळ आश्वासने दिली. बेमुदत संप मागे घेण्याची गळ घातली. लिखित स्वरुपात आश्वासनांची पूर्तता करण्यास अधिकारी असमर्थ ठरले. त्यामुळे यापूर्वीप्रमाणेच परिवहन अधिकारी आपली बोळवण करत आहेत याची जाणीव झाल्याने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला.

**कर्मचाऱ्यांच्या मागण्या**

आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाबरोबर वाहन चालक, मालक हे ग्राहक सेवेचे काम करावे लागते. यामुळे प्रशासकीय कामात गुंतागुंत निर्माण झाली आहे. या दुहेरी कामांच्या बोजामुळे कर्मचारी त्रस्त आहेत. महसुली विभागीय बदल्यांचे धोरण रद्द करण्यात आले नाही. विभागीय परीक्षांमध्ये अनावश्यक बदल करण्यात आले आहेत. आकृतीबंधाची योग्य अंमलबजावणी केली जात नाही. कर्मचाऱ्यांच्या हिताच्या कळसकर समितीच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे, बदल्या, बढत्यांमध्ये सेवा ज्येष्ठतेचा विचार न करणे. या कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. मोटार वाहन कर्मचारी संघटनेने वेळोवेळी या मागण्यांविषयी शासनाकडे दाद मागितली आहे. त्याची दखल शासनाने घेतली नाही. केवळ तोंडदेखली आश्वासने देऊन कर्मचाऱ्यांची वेळोवेळी बोळवण करण्यात आली. त्यामुळे यावेळी लेखी स्वरुपात मागण्या मान्य झाल्याचे पत्र परिवहन विभागाकडून दिले जात नाही, तोपर्यंत बेमुदत बंद मागे घेतला जाणार नाही, असे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी सांगितले.

दरम्यान वाहनांशी संबंधित कामे आरटीओ कर्मचारी संपामुळे रखडणार असल्याने वाहन मालक अस्वस्थ आहेत. शिकाऊ वाहन प्रशिक्षणार्थी पदाची परीक्षा रद्द होण्या बरोबर वाहनांशी संबंधित सर्व कामे कर्मचारी संपामुळे रखडणार असल्याने वाहन मालकांची आरटीओ कार्यालयात कामे उरकून घेण्यासाठी शुक्रवारी झुंबड उडाली आहे. आरटीओ कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षाच्या मागण्या प्रलंबित आहेत. नवीन प्रशासकीय बदलामुळे कामकाज करताना कर्मचारी त्रस्त आहेत. अशा अनेक मागण्यांकडे शासन लक्ष देत नसल्याने या महत्वपूर्ण विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आरटीओ कर्मचारी मंगळवारपासून बेमुदत संपावर जाणार आहेत, असे मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी सांगितले.

# स्वच्छता सेवा मोहिमअंतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे आयोजन




**पालघर/प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस (SBD) म्हणून साजरा केला जातो. त्यास अनुसरुन दरवर्षी प्रमाणे स्वच्छता ही सेवा (SHS) मोहिम दि. १७ सप्टेंबर २०२४ ते दि. २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत गाव स्तरावर ग्रामपंचायती अंतर्गत स्वच्छतेची जनजागरण करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्या येणार आहे. दि. २० सप्टेंबर रोजी पालघर तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र मुरबे, तारापूर, केलवा- माहिम, सातपाटी, दांडी, सोमटा, सफाले, एडवण, मासवण, दुर्वेस या १० ठिकाणी स्वच्छता मित्र सुरक्षा शिबिर आयोजित करण्यात आले होते. सफाई मित्र सुरक्षा शिबिर या उपक्रमाद्वारे सफाई मित्रांसाठी एक खिडकी योजनेद्वारे सर्व योजनांच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांकरीता मोहिम राबविण्यात यावी. यामध्ये घरकुल योजना, पाणी व जल निस्सारण, शौचालय, वीज, बँकीग, घरगुती गॅस (उज्वला योजना) आरोग्य विमा, लसीकरण, जीवन विमा यासारख्या विविध योजनांचा लाभ देण्याकरीता प्रयत्न सुरू राहणार आहे. सातपाटी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आयोजित केलेल्या स्वच्छता मित्र सुरक्षा शिबिर येथे जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक धनराज पांडे, तालुका आरोग्य अधिकारी तन्वीर शेख यांनी मार्गदर्शन केले. ज्या प्रमाणे सफाई कर्मचारी गावाचा स्वच्छता करून लोकांचे आरोग्य सुरक्षित करतात. या कर्मऱ्यांना आरोग्याच्या व त्यांना इतर सोई-सुविधा पुरविण्यास काम प्रशासन मदत करेल, असे जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक, धनराज पांडे यांनी यावेळी सांगितले.

# मोबाईल दिला नाही म्हणून तरूणीची आत्महत्या!

**डोंबिवली/प्रतिनिधी**

आईने मोबाईल हाताळण्यास दिला नाही म्हणून राग अनावर झालेल्या डोंबिवलीतील देसलेपाडा भागातील लोढा हेरिटेज भागातील एका १९ वर्षाच्या तरूणीने गुरुवारी रात्री राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. संजना हेमांगी झोरे असे मयत तरुणीचे नाव आहे. आई हेमांगी झोरे यांनी यासंदर्भात मानपाडा पोलीस ठाण्यात माहिती दिल्यानंतर पोलिसांनी अकस्मित मृत्युची नोंद केली आहे. आई हेमांगी आणि मयत मुलगी हे कुटुंब देसलेपाडा येथील लोढा हेरिटेजमधील एका गृहसंकुलात राहते. मयत मुलीची आई हेमांगी या नोकरी करतात. मयत मुलगी शिक्षण घेत होती. तिने मोबाईलवर वेळ घालविण्यापेक्षा अभ्यास करावा, असे आईचे मत होते. त्यामुळे आई तिला मोबाईल वापरापासून प्रतिबंध करत होती. गुरुवारी रात्री आई, मुलगी दोघी घरात होत्या. रात्री साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान मयत मुलीने आईकडे मोबाईल हाताळण्यास मागितला. त्यावेळी आईने मोबाईलपेक्षा अभ्यास कर असा सल्ला दिला. तिला मोबाईल देण्यास नकार दिला. याविषयी मयत मुलगी संजना झोरे हिला राग आला. तिने रागाच्या भरात घरातील एका खोलीत पंख्याच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. आईने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मुलगी आतून दरवाजा उघडत नव्हती. सोसायटीतील सदस्यांनी धावपळ करून खोलीत पाहिले तर संजनाने गळफास घेतला होता. मानपाडा पोलिसांना ही माहिती देण्यात आली. मुलीला तातडीने महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या मृत्युविषयी कोणावरही संशय नसल्याचे मुलीच्या आईने मानपाडा पोलीस ठाण्यातील दाखल नोंदीत म्हटले आहे. मानपाडा पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव पालवे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# तारापूर औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यामध्ये अपघात; पाच कामगार जखमी

**बोईसर/प्रतिनिधी**



तारापूर औद्योगिक क्षेत्रातील एका रासायनिक कारखान्यामध्ये अपघात होऊन पाच कामगार जखमी झाल्याची घटना घडली आहे. जखमी कामगारांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक एन.९० वरील कॅलीक्स केमिकल या रासायनिक कारखान्यामध्ये शुक्रवारी दुपारी १.४५ वाजेच्या सुमारास उत्पादन प्रक्रिया सुरू असताना ड्रायरचे तापमान अचानक वाढून त्याचा स्फोट झाल्याने आगीचा भडका उडाला. या अपघातात ड्रायरमधील रासायनिक पदार्थ शरीरावर पडून राजमनी मौर्य, पवन देसले, आदेश चौधरी, निशिकांत चौधरी आणि संतोष हिंडलेकर हे पाच कामगार गंभीररीत्या भाजले आहेत. रासायनिक पदार्थ अंगावर पडल्याने कामगारांचा चेहरा आणि हात पाय भाजले असून त्यांना उपचारासाठी औद्योगिक क्षेत्रातील खाजगी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले आहे. कारखान्यामधील अपघाताची घटना समजताच तारापूर अग्निशमन दलाने तातडीने पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले. अपघातस्थळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश अस्वार यांनी भेट देऊन पाहणी केली. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कॅलीक्स केमिकल या कारखान्यात अपघात होऊन आग भडकल्यानंतर त्यावर तातडीने नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक असलेली कारखान्याची अग्निशम यंत्रणा कुचकामी असल्याची माहिती पुढे आली आहे. कॅलेक्स केमिकल्स कारखान्यात लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शेजारील ग्लेन्फिन केमिकल्स या कारखान्याच्या अग्निशमन यंत्रणेचा वापर करण्यात आला.

# लातूर शहर महानगरपालिकेमार्फत दंतशल्यचिकित्सा सुविधेस सुरुवात!



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत विविध आरोग्य विषयक सेवा सुविधा नागरिकाना दिले जातात. परंतु, यामध्ये दंतशल्यचिकित्सा उपलब्ध नसल्या कारणाने ही सेवा लातूर शहर वासियांना उपलब्ध करून देण्याचा मानस मनपा प्रशासनाचा होता. तसेच माईर्स पुणे चे महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च (दंत महाविद्यालय व रुग्णालय) लातूर चा उद्देश समाजातील शेवटच्या घटका पर्यंत दंत चिकित्सा सुविधा पुरविणे आहे. त्यादृष्टीने आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मनपाच्या वतीने उपायुक्त (आरोग्य) डॉ पंजाब खानसोळे, आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती व चखऊठ प्राचार्य डॉ कांगणे यांनी योग्य ती प्रक्रिया पूर्ण करून दोन्ही संथांच्या सहकार्याने व परस्पर संमतीने नागरिकांसाठी दंतशल्यचिकित्सा सुविधा सुरु करण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आले आहेत या करारा अंतर्गत मनपातील चार(४) प्रा. आरोग्य केंद्र येथे अतिशय अल्प दरात दंत चिकित्सा सुविधा तज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे.

यामध्ये नियमित दंत तपासणी (OPD) सोबतच स्केलिंग, रूट कॅनल, दात काढणे, दातात सिमेंट भरणे आदि सेवा देण्यात येणार आहेत. तसेच संदर्भीय सेवा या माईर्स MIDSR येथील रुग्णालयात दात इम्प्लंट करणे, दंत कॅन्सर, गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आदि सुविधा देण्यात येणार आहेत. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी यावेळी MIDSR दंत महाविद्यालयाचे दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. तरी नागरिकांनी खालील नमूद केलेल्या चार ठिकाणी प्रा.ना.आ. केंद्र इंडिया नगर, प्रा.ना.आ.केंद्र गौतम नगर, प्रा. ना. आ. केंद्र तावरजा कॉलनी, मनपा दवाखाना काळे गल्ली या ठिकाणी दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ दिनांक २३/९/२०२४ पासून सकाळी १० ते २ या वेळेत घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि. पालघर**

**ऑफ लाईन निविदा सूचना क्र.४५ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील (ऑफ लाईन) सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता मागवित आहेत. कोरे निविदा नमुन्याची विक्री कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार येथे खालील दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सुचनेमध्ये एकूण ०६ (सहा) कामे समाविष्ट आहेत. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांचे कार्यालयातील सूचना फलकावर सदरची ऑफ लाईन निविदा पाहावयास मिळेल.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वाडा तालुक्यातील मौजे जोडरस्ता तयार करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,२१,४१४.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| २. | वाडा तालुक्यातील अबीटघर गाव अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,२१,४१४.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| ३. | वाडा तालुक्यातील तीळगाव अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,१९,९९४.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| ४. | वाडा तालुक्यातील कांबारे तरसेपाडा जोडरस्ता तयार करणे. ता.वाडा, जि. पालघर | ८,१८,०५३.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग० ५०५४५११७-५३ |
| ५. | वाडा तालुक्यातील डाहे लोखंडेपाडा जोडरस्ता तयार करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,१८,९०९.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| ६. | वाडा तालुक्यातील कुंभीस्ते जोडरस्ता तयार करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,१८,५९७.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |

**निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक : २४/०९/२०२४ ते दिनांक : २८/०८/२०२४ पर्यंत**
**निविदा स्विकृतीचा - दिनांक : ०३/१०/२०२४ (दुपारी १४.०० वाजेपर्यंत)**
**निविदा उघडणे (शक्य झाल्या) - दिनांक : ०४/१०/२०२४ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

टिप :-
१. ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.
३. ठेकेदाराने कोरे निविदा नमुने पोष्टाने मागविल्यास ठेकेदारांच्या जबाबदारीवर पाठविले जाईल. त्यास विलंब झाल्यास खाते जबाबदार राहणार नाही. त्यासाठी रु. २००/- जादा आकार पडेल.

**जा.क्र.: सा.बां.वि./जव्हार/निविदा/११०८८**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड ४०१ ६०३
फोन नं. ०२५२०-२२२२३६
दिनांक : १७/०९/२०२४

**सही/-**
**उप कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**जव्हार, जि. पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि १०२/४०८/२०२४ दिनांक : १९/०९/२०२४**

23 TO 29 SEPTEMBER 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 9/21/2024 8:08 PM Page 1




# सत्ताधाऱ्यांना महाराष्ट्रात दंगली घडवायच्या आहेत का?

शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने सर्व धर्मीय आहे. अगदी छत्रपती शिवाजी महाराजांपासून महाराष्ट्रात सर्व जाती धर्माच्या लोकांना सुरक्षेची आणि विकासाची समान संधी होती. महाराजांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊनच स्वराज्याचे तोरण बांधले. असे असताना शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राज्यात सरकार चालवणारे लोक, सध्या एका विशिष्ट धर्माच्या मागे हात धुवून लागले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात सध्या भीतीचे आणि दहशतीचे वातावरण आहे. ज्यावेळी अशी परिस्थिती निर्माण होते, तेव्हा सरकारची मोठी जबाबदारी असते. कारण सरकार किंवा सरकार मधील जे कोणी मंत्री संत्री असतात, ते कुठल्याही धर्माचे असोत, पण जेव्हा ते सरकारमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून काम करतात, तेव्हा सर्व जाती धर्माच्या लोकांची सुरक्षा त्यांच्या खांद्यावर असते. अशावेळी त्यांना कोणताही भेदभाव करता येत नाही. परंतु दुर्दैवाने सध्या महाराष्ट्रात दलित, मुस्लिम, आदिवासी यांचे जगणं कठीण झालेलं आहे. खास करून अल्पसंख्यांक समाजामध्ये एक भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. कारण सत्ताधारी पक्षातले आमदार अल्पसंख्यांकांना त्यांच्या मशिदीत घुसून मारण्याची भाषा करीत आहेत. जर महाराष्ट्रात अशी तुगलकी परिस्थिती निर्माण झालेली असेल, तर सरकार काय करते? याबाबत सरकारची काही जबाबदारी आहे की नाही? असा प्रश्न आज लोक विचारीत आहेत. सत्ताधारी पक्षातला एक मुजोर आमदार थेट गृहमंत्र्यांची भीती दाखवून लोकांना घाबरवतोय. पोलिसांना धमक्या देतोय. अल्पसंख्यांकांना मशिदीमध्ये घुसून मारण्याची भाषा करतोय. आणि या राज्याचे गृहमंत्री त्याला पाठीशी घालतात. याचा अर्थ काय? गृहमंत्री हे सर्व जाणून बुजून तर करीत नाहीत ना? यातून गृहमंत्र्यांना नेमके काय साधायचे आहे? वास्तविक राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी राज्याच्या गृहमंत्र्यांवर असते. परंतु गृहमंत्री जर आपल्या पक्षातील आमदारांना दुसऱ्या धर्मातील लोकांवर हल्ले करण्यासाठी मोकळे रान करून देणार असतील, तर महाराष्ट्रात कठीण परिस्थिती निर्माण होऊ शकते. कारण ज्याच्यावर अन्याय होतो तो फार काळ अन्याय सहन करू शकत नाही. कधी ना कधी त्याला अन्यायाच्या विरोधात रस्त्यावर उतरावेच लागते. पण त्यातून जी परिस्थिती निर्माण होते ती राज्याच्या विकासासाठी, स्थैर्यासाठी आणि सामाजिक सलोख्यासाठी अत्यंत धोकादायक असते. महाराष्ट्रात आजवर कधीही अशी परिस्थिती निर्माण झालेली नव्हती. आणि ज्या ज्या वेळी अशी परिस्थिती निर्माण झाली, त्या त्या वेळी सत्तेतील लोकांनी अत्यंत कठोर पावले उचलून जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांच्या मुस्क्या आवडल्या होत्या. पण आज खुद्द गृहमंत्री आपल्या पक्षातील आमदारांना पाठीशी घालून त्यांच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही याची काळजी घेत आहेत. त्यामुळे दुसऱ्या धर्माच्या लोकांना भीती दाखवणारे, त्यांना मशिदीत घुसून मारायची धमकी देणारे ,आणखी बिंदास झालेले आहेत. त्यामुळे अल्पसंख्याक समाजामध्ये अत्यंत संतापाचे वातावरण आहे. कारण शेवटी माणसाच्या सहनशीलतेला ही मर्यादा असते. आम्ही तुमच्या धर्माबाबत कधी वाईट बोलत नसताना, तुम्ही विनाकारण आम्हाला का धमक्या देत आहात? आम्ही सुद्धा या देशाचे नागरिक आहोत आणि या देशावर जितका तुमचा अधिकार आहे तितकाच आमचाही अधिकार आहे. असे अल्पसंख्यांकांचे म्हणणे आहे. आणि ते शंभर टक्के खरे आहे. कारण या देशासाठी, देशाच्या स्वातंत्र्यासाठी, प्रत्येक जाती धर्माच्या माणसाने रक्त सांडलेले आहे. त्यामुळे केवळ हिंदूंनी या देशावर आपला हक्क सांगू नये. या देशावर, इथल्या साधन संपत्तीवर, जितका अधिकार हिंदूंचा आहे. तितकाच अधिकार मुसलमानांचा आहे, तितकाच अधिकार ख्रिश्चनांचा आहे. बौद्धांचा आहे. शीख बांधवांचा आहे. त्यामुळे एका कुठल्या समाजाच्या माणसाने पाच-पन्नास लोक गोळा करून आपल्या धर्माची टिमकी वाजवायची, आणि दुसऱ्या धर्मावर टीका करायची, दुसऱ्या धर्मातील लोकांना मारायची धमकी द्यायची, हे अत्यंत भयानक आणि संविधान विरोधी आहे. आणि त्याकडे जर गृहमंत्री दुर्लक्ष करणार असतील तर गृहमंत्र्यांच्या विरोधात मोठे आंदोलन उभे राहू शकते. गृहमंत्री बदलण्याची मागणी होऊ शकते. महाराष्ट्रात समतेचे, सामाजिक न्यायाचे राज्य असताना, जेव्हा सत्ताधारी पक्षाचा एखादा आमदार दुसऱ्या धर्माबद्दल गरळ ओकतो,आणि त्याला त्याच्या पक्षाचा गृहमंत्री पाठीशी घालतो, तेव्हा विरोधी पक्ष काय करीत आहे असा सवाल विचारला जातो? हे सगळं घडत असताना विरोधी पक्षाच्या नेत्यांनी, जातीयवादी विष पसरवणाऱ्या आणि मुसलमानाला धमकी देणाऱ्या, त्या आमदाराच्या विरोधात किंवा त्याचा बॉस असलेल्या गृहमंत्र्याच्या विरोधात आवाज का उठवला नाही? किंवा त्यांची पंतप्रधान किंवा राष्ट्रपतींकडे रितसर तक्रार का केली नाही? हाच महाराष्ट्रातील दलित मुस्लिम अल्पसंख्यांकांचा विरोधी पक्षाला सवाल आहे. कारण कुठल्याही राज्यात सरकार इतकीच विरोधी पक्षाची भूमिका ही महत्त्वाची असते. कारण सरकार जर कुठे चुकत असेल तर त्या विरुद्ध बोलण्याचा कायदेशीर अधिकार विरोधी पक्षाला आहे. परंतु महाराष्ट्राच्या विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेत्यांनी अजून पर्यत तरी भाजपाच्या त्या जातीयवादी आमदाराविरुद्ध किंवा त्याला पाठीशी घालणाऱ्या त्याच्या बॉस विरुद्ध आक्रमक भूमिका घेतलेली नाही. याचा अर्थ विरोधी पक्ष नेतेही त्यांना सामील आहेत का? असा संशय व्यक्त केला जात आहे. अर्थात ते काही असो आता मुस्लिम समाज ही रस्त्यावर उतरला आहे. त्यामुळे जो कोणी त्यांच्या विरोधात मारण्याची, ठोकण्याची भाषा करणार असेल त्यालाही त्याच पद्धतीने उत्तर देण्याचा निर्धार मुस्लिम समाजाने केलेला आहे. तसे झाले तर या राज्यात पुन्हा एकदा जातीय दंगली घडतील आणि निवडणुकीच्या तोंडावर तसेच काहीतरी कटकारस्थान असल्याचे दिसत आहेत. अन्यथा सत्ताधारी पक्षातला गृहमंत्री राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडत असताना, ती बिघडवणाऱ्यांना पाठीशी घालणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील दलित आदिवासी ओबीसी आणि मुस्लिम समाजाने राज्याच्या गृहमंत्र्यांवर लक्ष ठेवावे. कारण याच गृहमंत्र्यांमुळे राज्यात तणावाची परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे जर विरोधी पक्ष काही करणार नसेल, तर आता लोकांनीच कायदेशीर मार्गाने या गृहमंत्र्याच्या विरोधात केंद्राकडे आवाज उठवावा किंवा न्यायपालिकेकडे दाद मागावी. कारण महाराष्ट्रातील लोकांना शांतता हवी आहे. पण गृहमंत्र्यांच्या आशीर्वादाने जर ही शांतता बिघडवण्याचे प्रयत्न कोण करीत असेल, तर त्याला त्याच्याच भाषेत उत्तर देण्याची वेळ आलेली आहे. महाराष्ट्र हा शांतता प्रिय आहे. त्याचबरोबर प्रज्ञावंत आहे. महाराष्ट्रातील हिंदू बांधवही अत्यंत शांतता प्रिय आहेत पण काही मुठभर हिंदुत्ववादी या देशात अल्पसंख्यांकांच्या विरोधात गरळ वोकुन इथले वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना रोखण्याची जबाबदारी आता इथल्या शांतता प्रेमी जनतेवरच आहे. ज्यामध्ये हिंदू, मुसलमान, बौद्ध, ख्रिश्चन आणि सगळ्याच लोकांची जबाबदारी आहे. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांनाही सत्ताधारी पक्षातले लोक जर धमकावत असतील आणि त्यांच्या धमकीमुळे पोलीस काही कारवाई करत नसतील, तर महाराष्ट्रातील परिस्थिती बिहार पेक्षाही भयंकर झाली आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी आता एकत्र येऊन राज्यातील गृहमंत्र्यांची हकालपट्टी करा अशी मागणी करून गृहमंत्र्याच्या हकलपट्टीसाठी मोठे आंदोलन उभारणे हीच काळाची गरज आहे.

# पीएम विश्वकर्मा योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## • अमरावती येथील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कचे भूमिपूजन • राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन • पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचा शुभारंभ • ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृतींच्या प्रदर्शनास प्रारंभ




**वर्धा/प्रतिनिधी**

पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या बहुआयामी प्रगतीचा नायक शेतकरीच राहणार असून त्याच्या समृध्दीसाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी येथे दिली. पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते. अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला.

आजच्याच दिवशी १९३२ मध्ये महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निर्मूलनसाठी सुरू केलेल्या अभियानाची आठवण करुन देतानांच बापूजींची कर्मभूमी आणि विनोबांची साधनाभूमी असलेल्या वर्ध्यातून विकसित भारताची निर्मिती करण्याच्या आमच्या संकल्पास ऊर्जा मिळते, असे सांगून प्रधानमंत्री म्हणाले, विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीच्या सोहळ्यासाठी आम्ही यामुळेच वर्ध्याची निवड केली. ही योजना केवळ एक सरकारी कार्यक्रम नसून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशात हजारो वर्षापासून असलेल्या कौशल्याचा वापर करण्याचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. इतिहासात आपल्या देशातील समृध्दीचा मोठा आधार पारंपरिक कौशल्य हाच होता. येथील वस्त्रोद्योग, शिल्पकला, धातूविज्ञान, अभियांत्रिकी अशा साऱ्याच बाबी जगात वैशिष्टपूर्ण होत्या. जगातील सर्वात मोठा वस्त्रनिर्माता भारतच होता. मात्र पारतंत्र्याच्या कालखंडात इंग्रजांनी स्वदेशी कौशल्य नष्ट केले. या पार्श्वभूमीवर गांधीजींनी वर्ध्यातूनच ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात बलुतेदारी समुहाची सातत्याने उपेक्षा झाली. त्यामुळेच प्रगती आणि आधुनिकतेत देशाची पिछेहाट झाल्याची खंत प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

कारागिरांच्या पारंपरिक कौशल्याचा सन्मान, सामर्थ्य आणि या समाजसमूहाची समृध्दी ही या योजनेमागची मूळ भूमिका असल्याचे स्पष्ट करुन श्री. मोदी म्हणाले, देशातील सातशेहून अधिक जिल्हे, अडीच लाखांहून अधिक ग्रामपंचायती तसेच हजारो स्थानिक नागरी संस्था या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील आहेत. दहा लाखांहून अधिक लोक या योजनेशी जोडले गेले असून आठ लाख शिल्पकारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले गेले आहे. त्यात केवळ महाराष्ट्रातीलच साठ हजारांहून कारागिर समाविष्ट आहेत. त्यांच्या कामाला आधुनिक आणि डिजिटल तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. साडेसहा लाख बलुतेदारांना आधुनिक साधने दिली गेली आहेत. या योजनेचा सर्वाधिक फायदा याच समाजसमूहांना होत आहे. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्यासोबतच सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रात मोठ्या औद्योगिक विकासाची क्षमता असून त्यात वस्त्रोद्योग हा अग्रणी आहे. विदर्भात कापसाचे क्षेत्र मोठे असुनही येथील शेतकऱ्यांची यापूर्वी उपेक्षा झाल्याची खंत व्यक्त करुन प्रधानमंत्री मोदी म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर नांदगाव खंडेश्वर येथे टेक्सटाइल पार्कची निर्मिती झाली. आता अमरावती येथे होत असलेले पीएम मित्रा पार्क हे वस्त्रोद्योगास नवी झळाळी प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नातील पुढचे पाऊल आहे. फार्म टू फायबर, फायबर टू फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेन अशा सुत्रातून आमचे प्रयत्न सुरू असून विदर्भातील उच्च दर्जाच्या सूतापासून तयार होणारे कपडे परदेशात निर्यात होऊन येथील शेतकरी समृध्द होतील. अमरावतीच्या पार्कमध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून १ लाखाचा रोजगार उपलब्ध होईल. औद्योगिक विकासासाठी पुरक असणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विदर्भातील सिंचन विकासासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा योजनेच्या अंमलबजावणीतून १० लाख एकर क्षेत्र सिंचित होणार आहे. याशिवाय कांदा, सोयाबीन उत्पादकांनाही विविध निर्णयाच्या माध्यमातून सरकार मदत करत आहे, असे प्रधानमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.

**कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा योजना महत्वाची -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

देशातील गरीब, वंचित तसेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा ही योजना अत्यंत महत्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून कारागिरांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याला प्राधान्य राहणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अमरावती येथे पीएम मित्रा पार्क हा देशातील वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसावर प्रक्रिया करून कापड निर्यातीला चालना मिळणार आहे. या पार्कमध्ये १० हजार कोटीची गुंतवणूक होणार असून सुमारे १ लाखापेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांमुळे राज्यातील महिला व इतर घटकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. केंद्रीय लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योग मंत्री जीतनराम मांझी यावेळी म्हणाले की, पीएम विश्वकर्मा ही योजना पारंपरिक कारागीर व शिल्पकारांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडविणारी आहे. त्यांना उच्च गुणवत्ता व प्रशिक्षण देऊन त्यांनी उत्पादित केलेला माल जागतिक बाजारपेठेत पाठवण्यास प्राधान्य दिले आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात १ लाख ४६ हजार कारागिरांची नोंदणी झाली आहे. कारागिरांना अत्याधुनिक साधनांसाठी ५ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येत असून त्यांच्या उत्पादीत वस्तुंना मोठी बाजारपेठ निर्माण करण्यात आली आहे. भारतातील कारागिरांनी तयार केलेल्या विविध वस्तुंच्या उत्पादनांचे प्रदर्शन वर्धा येथे आयोजित करण्यात आले असून या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामिण कारागिरांना प्रोत्साहन मिळणार असल्याचे श्री.मांझी यांनी यावेळी सांगितले. देशातील सात पीएम मित्रा पार्कपैकी अमरावती येथे होत असलेल्या पार्कच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यंत व कापडापासून फॅशनपर्यंतच्या सर्व प्रकारच्या एकत्र सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे मोठ्या गुंतवणुकीसह रोजगार उपलब्ध होईल. पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या बारा बलुतेदारांच्या विकासाचा विचार अद्यापपर्यंत कोणीही केला नाही, परंतू प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पीएम विश्वकर्मा सारख्या योजनेच्या माध्यमातून बाजारपेठेला अनुकूल असलेल्या वस्तुंची निर्मिती करण्यासाठी प्रशिक्षणासह आर्थिक सहाय्य कारागिरांना उपलब्ध करून दिले आहे. याचा लाभ समाजातील शेवटच्या कारागिरापर्यंत पोहोचत आहे. बलुतेदार समाजसमुहाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाले असल्याचे सांगून शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.पीएम मित्रा पार्कच्या माध्यमातून विदर्भासह राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. या पार्कमुळे पांढऱ्या सोन्याला खऱ्या अर्थाने सोन्याचे दिवस येणार असून येथे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये मोठे प्रकल्प गतिमानतेने पूर्ण केल्यामुळे पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा विक्रम केला असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. गडचिरोली येथे स्टील उद्योग तसेच महापे येथे सेमी कंडक्टर या उद्योगांचा यामध्ये समावेश आहे. प्रधानमंत्र्यांच्या विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आमचे सरकार संपुर्ण योगदान देईल, असा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**कारागिरांना प्रमाणपत्र, धनादेशाचे वितरण**

प्रधानमंत्र्यांनी कळ दाबून अमरावती येथील पीएम मित्र पार्क, राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्रांचे उद्घाटन केले तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्ट अप योजनेचा शुभारंभ केला. पीएम विश्वकर्मा योजनेच्या १ लाख कारागिरांना ओळखपत्र व प्रमाणपत्र तसेच १ लाख कारागिरांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. देशभरातील ७५ हजार कारागिरांना कर्जाचे वितरण देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. पीएम विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त भारतीय डाक विभागाने काढलेल्या विशेष डाक तिकिटाचे अनावरण प्रधानमंत्र्यांनी केले. सुरुवातीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चरख्याची प्रतिकृती तर केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांनी ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृती भेट देऊन प्रधानमंत्र्यांचे स्वागत केले. लघु, सुक्ष्म व मध्यम विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या परंपरागत ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या विविध आकर्षक कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.पंकज भोयर, दादाराव केचे, समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ.विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आदींची उपस्थिती होती.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने मिळणार मोफत प्रशिक्षण

**लातूर/प्रतिनिधी**

कौशल्य विकास व उद्योजकता विकास प्रशिक्षणा अंतर्गत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने लातूर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या मातंग समाज आणि तत्सम जातीतील विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यासाठी महामंडळाच्यावतीने तीन महिन्यांचे व्यावसायीक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील मातंग समाज व तत्सम जातीतील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी प्रशिक्षणासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. किमान दहावी उत्तीर्ण किंवा कोणत्याही शाखेतील शिक्षण घेत असलेले किंवा पदवीधारक उमेदवारांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने ३ महिन्यांचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. तरी यासाठी प्रमाणपत्राच्या सत्य प्रती जोडून महामंडळाच्या लातूर कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. उमेदवारांना टेलरिंग, संगणक, ब्युटी पार्लर, डोमेस्टिक डाटा एन्ट्री ऑपरेटर, अकाऊंट एक्झिक्युटिव्ह, सी.सी.टी.व्ही इन्स्टॉलेशन, मोबाईल रिपेअरिंग, ग्राफिक डिझाईन, ज्यूट प्रॉडक्टस स्टीचींग ऑपरेट आदी बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अर्जासोबत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्राचे सत्यप्रत दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र, आधारकार्ड, रहिवाशी दाखला, शिधापत्रिकेची सत्यप्रत, दोन रंगीत फोटो जोडावयाची आहेत.

## बालगृहात दाखल मुलीच्या नातेवाईकांनी संपर्क साधावा

लातूर : बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार सोनाली अंबादास कडगंजे या बालिकेला १ एप्रिल २०२४ रोजी लातूर एमआयडीसी येथील मुलींचे निरीक्षणगृह तथा बाल गृहात दाखल करण्यात आले आहे. तिची उंची १४८ सेमी असून तिचा चेहरा लंब गोलाकार आहे. रंग सावळा आहे व शरीराने सडपातळ आहे. या बालिकेचे माता-पिता,पालक व इतर नातेवाईक यांनी धम्मानंद कांबळे ९८२२१३७३२७ किंवा सागर मलावडे मो.नं.९७६५०६४९१७ यांच्याशी ३० दिवसांच्या आत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

23 TO 29 SEPTEMBER 2024 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 9/21/2024 8:08 PM Page 1



# लिंगायत समाजाला पुढे नेण्याचे स्वप्न -खा.डॉ.अजित गोपछडे




**उदगीर/प्रतिनिधी**

लिंगायत समाजाला पुढे नेण्याचे स्वप्न भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांनी पाहिले आहे. त्यांच्या सुचने नुसारच ही वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा सुरु केली असल्याचे प्रतिपादन खा.डॉ.अजित गोपछडे यांनी केले. महाराष्ट्रात दीड कोटी हुन अधिक लिंगायत समाज आहे. मात्र हा समाज विखुरला गेला असल्याने राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रात मागे राहिला आहे. अशा विखुरलेल्या समाजाला एकत्रित करून राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी ही यात्रा आहे. दि.५ सप्टेंबर पासून अहमदपूर येथून वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा सुरू केली आह या यात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधवांनी सहभागी व्हावे असेही आव्हान त्यांनी यावेळी केले. दरम्यान ही यात्रा सोमवारी उदगीर शहरात दाखल होताच शहरातील लिंगायत समाज बांधवांनी विविध ठिकाणी यात्रेचे जोरदार स्वागत केले. भाजपचे ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे यांच्या निवासस्थानी लिंगायत समाजातील विविध क्षेत्रातील समाज बांधवांशी खा.गोपछडे यांनी संवाद साधला. श्री हावगीस्वामी महाविद्यालयात व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात संस्था प्रतिनिधीं सोबत बैठक घेवून खा.डॉ. गोपछडे यांनी संवाद साधला. खा.डॉ. गोपछडे यांच्यासोबत भाजप नेत्या डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, यात्रेचे संयोजक नितीन शेटे, शिवानंद हैबतपुरे, अमोल निडवदे, विश्र्वजित गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संवाद साधताना खा.डॉ.गोपछडे म्हणाले की, मी एका शेतकरी कुटुंबातील सामान्य व्यक्ती आहे. भाजपच्या नेतृत्वाने लिंगायत समाजाचा प्रतिनिधी म्हणून मला खासदारकी दिली हे खरे आहे. दीड कोटी लिंगायत महाराष्ट्रात आहेत. त्याच समाजाच्या नावाने मी मोठा झालो असल्याने समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे खा. गोपछडे म्हणाले. ते म्हणाले की, राजकीय व इतर सर्व क्षेत्रातही लिंगायत समाजाचा विकास झाला पाहिजे ही भूमिका घेऊन आपण फिरत आहोत. या कार्यात व राष्ट्रकार्यात लिंगायत समाजाच्या युवकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. सन्मान यात्रेच्या माध्यमातून सर्व क्षेत्रातील युवकांना एकत्रित आणून संवाद साधण्याचे आपण काम करीत आहोत. लिंगायत समाजाला दिशा देणारी ही यात्रा आहे. म.बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा तरुणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन खा.डॉ.गोपछडे यांनी केले. कोणतीही गोष्ट मागून मिळत नाही, कर्तृत्वाने पदे मिळतात. सातत्य व निष्ठा ठेवून काम करा. नक्कीच यश मिळू शकते असा सल्ला राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या युवकांना त्यांनी दिला. अहमदपूर येथील भक्तीस्थळापासून निघालेली ही यात्रा राज्यातील ५७ विधानसभा मतदारसंघातुन लिंगायत समाजाचे शक्तीस्थळ असलेल्या मंगळवेढा येथे आल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत यात्रेचा समारोप होणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने तेथे उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना राजेश्र्वर निटूरे यांनी समाजबांधवांनी गोपछडे यांच्या पाठीशी शक्ती उभी करावी. समाज म्हणून एकत्र येणे काळाची गरज असून भाजपने लिंगायत समाजाला न्याय दिला असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी बोलताना अर्चना पाटील चाकूरकर यांनी या यात्रेच्या माध्यमातून समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मंडळींचा सन्मान होत आहे हे उल्लेखनीय आहे असे सांगितले. आम्ही तुमच्या सोबत आहोत अशी खात्री त्यांनी खा.डॉ. गोपछडे यांना दिली. यावेळी श्री हावगीस्वामी महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष ॲड.गुणवंतराव पाटील, सचिव उमेश पाटील देवणीकर, उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, शंकरअप्पा हरकरे, गिरीश पाटील कौळखेडकर, रवींद्र हसरगुंडे, प्राचार्य डॉ. यमेकर यांच्यासह संस्था पदाधिकारी व प्राध्यापक तसेच माजी आमदार प्रा.मनोहर पटवारी, रामचंद्र तिरुके, शैलेश स्वामी,मल्लिकार्जुन चिल्लरगे, माजी जिप सदस्या उषा रोडगे, महादेव नोबदे, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील, डॉ.जय पटवारी यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# नालासोपारा पुन्हा हादरलं; चाकूचा धाक दाखवून विवाहितेवर सामूहिक बलात्कार




**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यात सामूहिक बलात्काराची आणखी एक घटना उघडकीस आली आहे. नालासोपारा पूर्वेला राहणाऱ्या एका विवाहित महिलेला चाकूचा धाक दाखवून बलात्कार करण्यात आला आहे. तुळींज पोलीस याप्रकरणी दोन स्थानिक गुंडांचा शोध घेत आहेत. मागील २० दिवसातील नालासोपारा शहरातील सामूहिक बलात्काराची ही चौथी घटना आहे. ३२ वर्षीय पीडित महिला आपल्या कुटुंबियांसह नालासोपारा पूर्वेच्या संतोषभुवन परिसरात राहते. मंगळवार १० सप्टेंबरच्या रात्री ९.००च्या सुमारास ती आपल्या मुलाला क्लासवरून आणण्यासाठी नालासोपारा पूर्वेच्या मोहरा हायस्कूल येथील गुलाब गल्लीत गेली होती. त्यावेळी जितेंद्र यादव उर्फ काटू याने पीडित महिलेचे तोंड दाबून तिला बळजबरीने गल्लीतून खेचून जवळील एका खोलीत नेले. तेथे जितेंद्र यादव आणि अवी जैस्वाल उर्फ बिल्लू या दोघांनी चाकूचा धाक दाखवून सामूहिक बलात्कार केला. हा प्रकार कुणाला सांगितल्यास ठार मारण्याची धमकी दिली. सुरवातीला धमकीमुळे घाबरून महिलेने तक्रार केली नव्हती. मात्र तिच्या कुटुंबियांनी या गुंडाविरोधात तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला. शनिवारी त्यांनी तुळींज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७० (१), ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. मागील २० दिवसात नालासोपाऱ्यात सामूहीक बलात्काराची ही चौथी घटना आहे. यातील एक प्रकरण आचोळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत तर तीन घटना तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्या आहेत. दोन प्रकरणात अल्पवयीन मुलींवर सामूहिक बलात्कार करण्यात आला आहे.

दरम्यान ३ सप्टेंबर २०२४- कामाच्या शोधासाठी आलेल्या महिलेवर नालासोपाऱ्याच्या धानिव बाग येथे दोघांचा सामूहिक बलात्कार, ९ सप्टेंबर २०२४- गणेश आगमन सोहळा पाहण्यासाठी गेलेल्या १४ वर्षांच्या मुलीवर दोन इसमांकडून शिर्डीनगर येथे सामूहिक बलात्कार, तर २२ ऑगस्ट २०२४- नालासोपारा येथील धानिव बाग परिसरात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोघांनी सामूहिक बलात्काराची घटना घडली होती.


# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मंदीर परिसराची स्वच्छता!




**पालघर/प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस (SBD) म्हणून साजरा केला जातो. त्यास अनुसरुन दरवर्षी प्रमाणे स्वच्छता ही सेवा (SHS) मोहिम दि. १७ सप्टेंबर २०२४ ते दि.२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत गाव स्तरावर ग्रामपंचायती अंतर्गत स्वच्छतेची जनजागरण करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२४ साठी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही थीम निश्चित केली आहे. आज स्वच्छता हि सेवा २०२४ अभियान अंतर्गत पालघर तालुक्यात ग्रामपंचायत बिरवाडी व उमरोळी येथे मंदीर परिसराची केली स्वच्छता यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, प्रकल्प संचालक जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन धनराज पांडे, पालघर पंचायत समितीच्या सभापती शैला कोल्हेकर, गट विकास अधिकारी नरेंद्र रेवंडकर व ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# खैराची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीला मुद्देमालासह अटक




**वाडा/प्रतिनिधी**

वन अधिकारी चंद्रशेखर बडे यांना सावरखंड गावातुन खैराच्या झाडाची अवैद्य तोड करून एका टेम्पोटून चोरुन नेत असल्याची खबर मिळाली होती. त्या अनुषंगाने वाडा तालुक्यातील सावरखंड येथे रात्री तीन वाजताच्या सुमारास वन अधिकारी व त्यांचे सोबत वनमजूर दिलीप पाटील, लडकु तरसे, लक्ष्मण तरसे व प्रकाश हाडळ गस्थ घालत असताना टाटा इन्ट्रामध्ये खैराचे एकूण २४ नग आढळून आले. टेम्पो सोबत दुचाकी वरून टेहळणी करणारे दोघे अनोळखी इसम दुचाकी टाकून फरार झाले आहेत. वन अधिकारी यांच्या फिर्यादिवरून वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खैराचे सोललेले २४ नग एकूण किंमत ३० हजार रुपये, दुचाकी किंमत रुपये ४५ हजार रुपये व टाटा इन्द्रा टेम्पो किंमत रुपये ३ लाख ५० हजार रुपये असा एकूण ४लाख २५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून टेम्पो चालक सरफराज मेहमूद खान याला अटक केली आहे.

# पालघर जिल्हा परिषद येथे प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पालघर येथे प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. बांधकाम व आरोग्य समिती सभापती संदेश ढोणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे हे मराठी पत्रकार, समाजसुधारक, वक्ते, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पुढारी होते. यांचे महात्मा फुले हे आदर्श होते. प्रबोधनकार हे लेखक, पत्रकार व इतिहास संशोधकही होते. त्यांनी सारथी, लोकहितवादी व प्रबोधन या नियतकालिकांच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा प्रसार केला. कोदंडाचा टणत्कार, भिक्षुकशाहीचे बंड, देवांचा धर्म की धर्माची देवळे, ग्रामधान्याचा इतिहास, कुमारिकांचे शाप, वक्तृत्वशास्त्र इत्यादी ग्रंथासह समर्थ रामदास, संत गाडगे महाराज, रंगो बापूजी, पंडिता रमाबाई, माझी जीवनगाथा (आत्मचरित्र) ही चरित्रे अशा साहित्यसंपदेची त्यांनी निर्मिती केली. अशा थोर महापुरुषाची जयंती आज साजरी करण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

# जुगारात कर्जबाजारी तरुणाची आत्महत्या

**विरार/प्रतिनिधी**

ऑनलाईन जुगारात कर्जबाजारी झाल्याने गुजरातच्या वापी जिल्ह्यात राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणाने विरारच्या वैतरणा खाडीत उडी मारू आत्महत्या केली. अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावर त्याचा मृतदेह आढळला. सपन पटेल (२७) हा तरुण गुजराथ जिल्ह्याच्या वापी येथे राहतो. २ सप्टेंबरला तो आपल्या दुचाकीने मुंबईत जाण्यासाठी निघाला होता. मुंबईत नोकरीसाठी मुलाखत देण्यासाठी जात असल्याचे त्याने सांगितले होते. मात्र तो घरी परतला नसल्याने त्याचा शोध सुरू होता. दरम्यान त्याच्या घरात त्याने लिहिलेली एक चिठ्ठी त्याच्या कुटुंबियांना आढळली. त्यात ऑनलाईन जुगारामुळे १५ लाखांचे कर्ज झाल्याने मी आत्महत्या करत असल्याचे लिहिले होते. ती चिठ्ठी वाचून कुटुंबियांना धक्का बसला आणि त्यांनी वापी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वापी पोलीस त्याचा शोध घेत होते. दरम्यान, १२ सप्टेंबर रोजी विरारच्या अर्नाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील समुद्रात पोलिसांना एका तरुणाचा मृतदेह आढळला होता. हा मृतेदह सपन पटेलचा होता. त्याची दुचाकी विरारच्या मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडली होती. वैतरणा खाडीत त्याने उडी मारून आत्महत्या केली होती. त्याचा मृतदेह वाहून अर्नाळा समुद्रकिनारी आला होता, अशी माहिती अर्नाळा पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक शिंगारे यांनी दिली.

# वसई-विरारमध्ये गणेशोत्सव काळात ७ दिवसांत २१ हजार किलो निर्माल्य संकलित

**विरार/प्रतिनिधी**

वसई विरार शहरात जल्लोषपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा होत असून, महापालिका पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबवत आहे. गणेशोत्सव काळात वसई विरार शहर महानगरपालिकेने संकलित झालेल्या निर्माल्यापासून खत निर्मिती करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मागील सात दिवसात विसर्जनादरम्यान २१ हजार किलो निर्माल्य संकलित झाले आहे. बचत गटांच्या महिलांमार्फत ही खतनिर्मितीची प्रक्रिया सुरू झाली आहे. याशिवाय निर्माल्यातील टाकाऊ वस्तूंपासून विविध गृहोपयोगी वस्तू देखील तयार केल्या जात आहेत. एकिकडे कृत्रिम तलावामुळे नैसर्गिक तलाव, खाड्यांचे संरक्षण केले जात असून निर्माल्यापासून खतनिर्मितीमुळे महापालिकेचा गणेशोत्सव खर्या अर्थाने पर्यावरणपूरक ठरत आहे. पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेचे हे तिसरे वर्ष आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून विसर्जनादरम्यान जमा होणारे निर्माल्य संकलित करून त्यापासून महिला बचत गटांमार्फत खतनिर्मिती करण्यात येते. शहर महानगरपालिकेने विसर्जनाकरिता १०५ कृत्रिम तलाव उभारले असून, त्या ठिकाणी निर्माल्य संकलित करण्यासाठी निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत. यासह नैसर्गिक तलाव, खाडी, समुद्र आदी जेथे विसर्जन होते तेथेही निर्माल्य कलश ठेवण्यात आलेले आहेत. यंदाच्या गणेशोत्सवात दीड दिवसीय, पाच दिवसीय, गौरी-गणपती आणि सात दिवसीय विसर्जनादरम्यान साधारण २१ हजार किलो निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यापासून शहरात विविध ठिकाणी



८ बचत गटाच्या ५७ महिलांमार्फत खत निर्मिती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. खत निर्मितीसाठी महिलांना जागा आणि साहित्य महानगरपालिकेने उपलब्ध करून दिले आहे. महापालिकेचे स्वच्छता दूत बचत गटातील महिलांना खत निर्मितीचे आणि वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देतात. या प्रशिक्षण मिळवलेल्या बचत गटाच्या महिलांना निर्माल्याापासून तयार झालेल्या खताची विक्री करून आर्थिक फायदा मिळतो. निर्माल्य कलशात निर्माल्यासह प्लास्टिकच्या, सजावटीच्या आणि इतर टाकाऊ वस्तू सापडतात. यापासून विविध वापर करण्याजोग्या वस्तू बचत गटाच्या महिलांमार्फत तयार केल्या जात आहेत. टाकाऊपासून विविध गृहोपयोगी वस्तू, आभूषणे आदी बनविले जाते आहेत. या वस्तुंच्या विक्रीतून महिलांना आर्थिक उत्पन्नही मिळणार आहे. दरम्यान मागील वर्षी २३ हजार किलो निर्माल्य संकलित झाले होते आणि त्यापासून ४ हजार ८०० किलो खत तयार करण्यात आले होते. हे खत महापालिका क्षेत्रातील उद्यानांमध्ये वापरण्यात आले होते. तसेच नागरिक आणि शेतकऱ्यांना खताची विक्री करण्यात आली होती, ज्याद्वारे बचत गटाच्या महिलांना अर्थार्जन झाले, असे पालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले.

# विविध मागण्यांसाठी धर्मवीर विचार मंचचा तहसील कार्यालयावर धडक मार्चा

**वाडा/प्रतिनिधी**




सर्वसामान्यांच्या हितासाठी व गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्याच्या प्रामाणिक हेतूने संस्थापक अध्यक्ष मिलिंद पष्टे यांनी धर्मवीर विचार मंचची स्थापना केली असून गुरुवारी(दि.१९ सप्टेंबर) जनहिताच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत या मुद्द्यावर पहिला मोर्चा काढण्यात आला या मोर्च्याला समाज बांधवांसह भगिनीही स्वयं स्फूर्तीने सहभागी झाल्या होत्या. मौजे-वावेघर येथील मे.ब्ल्यू बेरी ॲग्रो प्रॉडक्ट कंपनीकडून स्थानिकांना होत असलेल्या त्रासाबाबत व कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात संबंधित कंपनीवर तात्काळ कारवाई करणे, वाडा तालुक्यातील खेळाडुच्या कलागुणांना वाव व प्रोत्साहन देण्यासाठी नियोजित कोने येथील क्रीडासंकुलाचे काम तातडीने सुरू करणे, वाडा ग्रामीण रूग्णालयातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ करून सर्व सोयीसुविधांनी युक्त असे १०० खांटाचे रूग्णालय उभारणे, तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा, वसतिगृहे, खाजगी क्लासेसमध्ये सि.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय करून संबंधित संस्थाचालक, शाळांना सक्ती करून कठोरपणे अंमलबजावणी करणे, महिलांवरील अत्याचार, धर्मांतरण, गो-तस्करी विरोधात कठोरात कठोर कारवाई करणे, ग्रामपंचायत पालसई हद्दीतील मौजे असनस येथील मे क्लॅपर्स सिझनिंग ॲन्ड स्पाईस एल.एल.पी या कंपनीकडून महिला कामगारांना अत्यल्प वेतन देवून आर्थिक पिळवणूक होत असल्याने संबंधित कंपनी व्यवस्थापनावर कायदेशीर कारवाई करून महिला कामगारांना किमान वेतन दर मिळावे, मीटर भाडे व इतर उपकरांच्या नावाखाली वाढीव वीज बीलाची आकारणी करणे, महिन्याचे वीज बील थकल्यास ग्राहकांस लेखी पुर्वसूचना न देता वीज पुरवठा खंडीत करणे, ग्राहकांवर मनमानी करणे अशा विविध समस्या घेऊन मोठ्या जनसमुदायस मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. धर्मवीर विचार मंचच्या शिष्ट मंडळाने अधिकाऱ्यांसी चर्चा केली.मात्र यावेळी प्रश्नांची योग्य उत्तरे देण्यासाठी कोणीही सक्षम अधिकारी नस्ल्यने सोमवारी पुन्हा शिष्ट मंडळाची बैठकीचे आयोजन केले आहे. आज आम्ही प्रलंबित मागण्यांचे लेखी निवेदन दिले आहे, पुन्हा सोमवारी बैठकीला उपस्थित राहणार आहोत तरीही मागण्या मान्य नाही झाल्या तर तहसील कार्यालया समोर ठिय्या आंदोलन करणार अस्ल्यचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पष्टे यांनी सांगितले.

## अनोळखी मयत इसमाच्या नातेवाईकांच्या शोधात विरार पोलीस



विरार पोलीस ठाणे हद्दीतील महापालिका तळावा जवळ एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे, त्याची नोंद विधान पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विरार पूर्वेकडील वसई विरार महानगरपालिकेच्या तलावात पोहत असताना बुडून मृत्यू झाला असून मयत इसमाचे वर्णन खालील प्रमाणे आहे. इसमाच्या उजव्या हाताचा पंजा नसून मनगटापर्यत अर्धा आहे. अंगावर निळसर या रंगाची चौकडी फुल पेंट काळ्या रंगाचा फुल पॅन्ट असा परिधान केलेला आहे. विरार पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. त्याची ओळख पटवून आलेली नाही. मयत इसमाच्या वारसांची शोध विरार पोलीस ठाण्याचे सपोनी संतोष सलोनकर करीत आहेत. कोणास काही कळाले तर पोलीस ठाण्यात (०२५०२५२८२२२) संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विरार हद्दीतील मयत इसमाच्या नातेवाईकाचा शोध



विरार पोलीस ठाणे हद्दीत सुधाकर सावले वय अंदाजे ६० वर्षे पूर्ण. नाव पत्ता माहीत नाही. हा अनोळखी इसम ताप व आकडी आल्याने त्याला जीवदानी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले होते. या इसमाचा उच्चार दरम्यान मयत झाले असून विरार पोलीस ठाण्यात अकस्मित मृत्यू ची नोंद झाली रजिस्टर नंबर १९३/२०२४ नोंद केली आहे. त्याची ओळख पटून आली नाही याबद्दल कोणाला काही माहिती असेल तर यार पोलीस ठाण्यात संपर्क करावा. या गुन्ह्याचा तपास सपोनी संतोष सलोनकर करीत आहेत.

23 TO 29 SEPTEMBER 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 9/21/2024 8:09 PM Page 1



पान १ वरून....

## समाधानला लागला तृतीयपंथीयाचा...

दिसला. त्यांनी या घटनेची माहिती मोठेवाडी गावातील लोकांना दिली. विहिरीत एका महिलेचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याची माहिती मिळाल्याने सकाळी सकाळी लोकांनी घटनास्थळी गर्दी केली. कुणी तरी लगेच या घटनेची माहिती म्हसवड पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गावकऱ्याच्या मदतीने विहिरीतील त्या महिलेचा मृतदेह पाण्याबाहेर काढला.मयत महिलेच्या कमरेला मोठा दगड बांधून मृतदेह पाण्यात टाकला असल्याने दगडासह मृतदेह बाहेर काढण्यात आला. मयत महिला ही २५ वर्षीय तृत्तीय पंथीय असल्याचे समोर आले. त्याचे नांव राशी उर्फ राहुल अजिनाथ घुटुकडे असे होते. राशी हा मोठेवाडी येथील तृत्तीय पंथीय असल्याने त्याला गावातील लोक ओळखत होते. पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून तपासाला सुरूवात केली. राशी उर्फ राहुल याचा साडीने गळा आवळून खून केल्याचे दिसत होते. राहुल अजिनाथ घुटुकडे हा २५ वर्षीय तरूण म्हसवड माण परिसरात तृत्तीयपंथीय म्हणून वावरत होता.तो दिसायला देखणा आणि चिकना होता. एकद्या महिलेला मागे टाकेल असे त्याचे सौंदर्य होते. तो कायम साडीतच वावरत असल्याने आजुबाजुचे तरूण आणि त्याच्या ओळखीचे लोक त्याची कायम छेडछाड काढत असायचे. काही जण त्याला छक्का छक्का म्हणून ही बोलवित होते. त्याच्या अशा वागण्याने त्याच्या घरच्या लोकांनी त्याला घराबाहेर काढले होते. तो आपल्या मित्राच्या घरी राहत होता. तो मित्र ही त्याच्याप्रमाणे तृत्तीयपंथीय होता. त्यामुळे त्या दोघांचे जमत होते. हल्लीचे काही तरूणांना बाईचे प्रेम मिळाले नाही तर ते तृत्तीयपंथीय लोकांच्या आहरी जातात. त्याच्याकडून त्यांना एका बाईकडून जे सुख मिळत नाही ते सुख तृत्तीयपंथीयाकडून मिळत असते. बऱ्याचवेळेला ते त्याच्या इतक्या आहरी जातात की,ते त्याच्यावर प्रेम करू लागतात.सेक्सच्या बाबत ते तृत्तीयपंथीयावर अंवलबून राहतात. बऱ्याचवेळेला पुरूष असून ही हे तृत्तीयपंथीय लोक आपले मुळ नाव बदलून एकादया मुलीचे नाव धारण करतात.ते त्या मुलीसारखे नटापट्टा करून सांजशृंगार करतात. राहुलनेही आपले नाव राशी असे धारण केले होते. त्यामुळे त्याला लोक राशी म्हणूनच बोलवित होते. तृत्तीयपंथीयच्या नावाखाली बरेचजण नको तो धंदा करीत असतात. राशी ही रात्री अपरात्री बाहेर फिरून धंदा करीत असे. वासनांध तरूण त्याच्याकडून आपली लैंगिक गरज भागवून घेत त्याबद्दल्यात पैसे ही देत होते. त्याने आपल्या देहाचा बाजार मांडला होता. तरही दिवड येथील समाधान चव्हाण नावाचा तरूण त्याच्या प्रेमात पडला होता. समाधानला ज्या ज्यावेळी सेक्सची इच्छा होईल त्या त्यावेळी तो राशीला घेऊन बाहेर जायचा. त्यातून त्या दोघांचे प्रेम वाढत गेले. समाधानचे ही आयुष्य विस्कटले गेले होते. तो विवाहित होता. परंतु त्याची बायको त्याच्याजवळ राहत नसल्याने तो राशीकडून आपली ती गरज भागवत होता. हल्ली समाधान हा राशीला ठेवून घेतल्यासारखे वागत होता. तिच्याकडून पाहिजे ते सुख मिळविण्यासाठी तो तिला प्रेमाच्या आणाभाका करीत होता. तिला लांगून लाचून लावीत होता. तिला तो मी तुझ्याशी लग्न करतो असे सांगत होता. त्यामुळे राशी ही त्याला कधी कधी फुकट काम करू दयायची. दोघांतील नाते वाढत चालले होते.सेक्समुळे ते दोघे नको तितक्या जवळ आले असल्याने राशी समाधानला आपला नवरा मानत होता. त्या दोघातील प्रेमसंबंध राशीच्या जवळच्या मित्रांना ही माहिती झाले होते. तृत्तीयपंथीय ही लग्न करतात आपला संसार मांडतात असे मानले जाते. बहुदा बऱ्याच तृत्तीय पंथीय हे देवाशी लग्न करीत असल्याने त्यांना देवालाच सोडले आहे असे म्हटले जाते. त्यातून ही बरेच तृत्तीय पंथीय हे पोटापाण्यासाठी सेक्सचा मार्ग निवडतात. मग एखाद्याशी चांगली ओळख झाली की, त्याच्याशी लग्न करण्याचा विचार करतात. खरे तर तृत्तीयपंथीयाशी लग्न करणे म्हणजे समलैंगिक विवाह करण्यासारखेच आहे. बऱ्याच जणांना हे ररूचते तर काही जणांना आवडत नाही.पण इथे राशी उर्फ राहुल याला समाधानने आपल्या सोईसाठी लग्नाचे अमिष दाखविले होते. त्याबद्दल्यात तो त्याच्याकडून पाहिजे तसे शारीरिक सुख ही घेत होता. पण हल्ली समाधानचे मन बदलले होते. त्याला वाटत होते की कशाला एखाद्या तृत्तीयपंथीयाबरोबर लग्न करून आपल्या आयुष्य बरबाद करून घ्यायचे. त्यामुळे तो राशीला टाळत होता. हल्ली तो त्याला फोन ही करीत नव्हता तर कधी भेटत ही नव्हता.त्याचेत हल्ली या कारणातून भांडणे ही होऊ लागली होती. राशी उर्फ राहुल हा तृत्तीयपंथीय असल्याने तो भांडणात समाधानला घाणेरड्या भाषेत शिव्या देत होता. त्याची भांडणे विकोपाला गेली होती. त्यातच राशीने त्याला धमकी दिली की, तु जर माझ्याशी लग्न केला नाहीस तर मी तुझ्या घरात घुसेन तुझ्या घरात येऊन बसेन त्यामुळे समाधानचे धाबे दणाणले होते. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. कशाला याच्याबरोबर जवळीक साधली, कशाला याच्याबरोबर प्रेमाचे नाटक केले असे त्याला झाले होते राशी ही त्याच्यामागे सारखा लग्नाचा तगादा लावीत होती. कुठल्या ही परस्थितीत तु माझ्याबरोबर लग्न केलास तर बरे नाही तर तुझी काही खैर नाही असे ती त्याला बोलली होती. त्यामुळे समाधान हा सैरभैर झाला होता. तो राशीला भेटला की, माझ्या घरचे लोक आपल्या लग्ननाला विरोध करीत आहेत मला त्याच्या शब्दांच्यापुढे जाता येत नाही असे तो तिला म्हणायचा कसे तरी तिची समजुत काढण्याचा प्रयत्न करायचा परंतु राशी ही चिडली की, त्याची आई बहिण काढत तुला माझ्याबरोबर मजा मारताना सेक्स करताना तुझ्या घरचे लोक आठवले नाहीत आणि आता लग्न करताना तुला घरचे लोक आठवायला लागलेत म्हणून भांडण काढत असायचा. त्या दोघांची भांडणे ही राशीच्या मित्रांना मिठवून समाधानला तु तिच्याशी लग्न कर असा सल्ला दिलेला होता. सगळेतृत्तीयपंथीय एक झालेले बघून समाधान हा घाबरला. आता या राशीचे काही तरी बरेवाईट केले तरच आपली यातून आपली सुटका होणार हे त्याने ओळखले. राशीला संपविले तर आपल्या मागची कायमची ब्याद निघून जाईल असा त्याने विचार केला. शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री त्याने राशीला मसाईवाडी येथील नागोबामंदिर जवळ काम करण्यासाठी बोलावून घेतले. तेथे तो आल्यावर रात्रीच्या अंधारात मंदिराच्या मागे असणाऱ्या मोकळ्या जागेत नेवून समाधानने त्याला पुढे वाकण्यास सांगितले. त्याप्रमाणे राशीने आपली चड्डी काढून पुढे वाकली.समाधानने तिच्याबरोबर लैगिक समाधान घेतले. राशीने ही त्याच्याबरोबर हस्तमैथून केले. दोघांची ही गरज पुर्ण झाल्यावर मुळ मुद्दयावर राशी आली. तिने त्याला तु माझ्याशी लग्न करतोस की नाही. तुझ्या घराकडे मला नेतोस की नाही असे म्हणून त्याच्याबरोबर भांडण काढायला सुरूवात केली. त्याने लग्नाला नकार दिल्यावर आणि नेहमीचेच आपले तुणतुणे वाजविल्यावर राशीने त्याच्या कानाखाली वाजविली. त्यावेळी समाधान हा त्याच्यावर चिडला. बोलत बोलत ते दोघे पानवनडे आले. तेथील विजय सिन्हा याच्या विहिरीजवळ आल्यावर समाधानने रागच्या भरात राशीच्या अंगावरील साडीने तिचा गळा जोरात आवळून घरत मी रांडे म्हणत माझ्याशी लग्न करण्याचा विचार करतेस काय असे म्हणत त्याने तिचा गळा जोरात आवळून धरला. तिला त्याने जरा ही हालण्याची संधी दिली नाही. काही क्षणातच साडीचा फास राशीच्या गळ्याला आवळला गेला.त्याचा जागीच मृत्यू झाला. तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची म्हणून त्याने बाजुलाच पडलेला मोठा दगड घेतला. तो दगड त्याने राशीच्या कमरेला बांधला. त्याने बांधलेल्या दगडासह तिचा मृतदेह विजय सिन्हा याच्या विहिरीत टाकला आणि तेथून निसटता पाय घेतला. दुसऱ्या दिवशी त्या परिसरात असणाऱ्या शेतकऱ्यांना त्या विहिरीत एका महिलेचे प्रेत पाण्यावर तरंगताना दिसले. त्यानी या घटनेची माहिती मोठेवाडी गावात दिल्यावर लोकांनी घटनास्थळी गर्दी केली. कुणी तरी या घटनेची माहिती म्हसवड पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने विहिरीतील पाण्यातून मृतदेह पाण्याबाहेर काढून पंचनामा केला. मयताचा गळा आवळल्याच्या खुणा दिसत होत्या. मयत महिला ही तृत्तीय पंथीय असून तिचे नाव राशी उर्फ राहुल अजिनाथ घुटुकडे असल्याची ओळख पोलीसांनी पटविली. पंचनामा करून मृतदेह पोलीसांनी म्हसवड येथील सरकारी रुणालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत राशीचा चुलत भाऊ तुषार रंगनाथ घुटुकडे याच्याकडून घेतली. मयत राशीचे प्रेमसंबंध दिवडे गावातील समाधान चव्हाण याच्याशी असल्याचे आणि राशीने त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावल्याची माहिती मिळताच पोलीसांनी दिवडे येथून संशयावरून समाधान विलास चव्हाण याला ताब्यात घेऊन त्याला म्हसवड पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून त्याचे व राशीचे प्रेमसंबंध असल्याचे कबुल करून तिने त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावल्याने रागाच्या भरात मी तिचा गळा आवळून खून केला आणि मृतदेह विहिरीत टाकून दिल्याचे सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी तुषार घुटुकडे याच्याकडून या घटनेची फिर्याद घेतली. त्याने म्हसवड पोलीसात दिलेल्या तक्रारीवरून राशी उर्फ राहुल अजिनाथ घुटुकडे (वय २५) हिचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी समाधान विलास चव्हाण (वय ३०) याच्या विरोधात आयपीसी कलम १०३,(१) ३ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला म्हसवड येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने समाधान चव्हाण याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनवली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला दगड जप्त केला.पोलीस अधिक्षक समीर शेख अप्पर पोलीस अधिक्षक वैशाली कडुकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे याच्या मार्गदर्शनाखाली म्हसवड पोलीस स्टेशनचे सपोनी सखाराम बिराजदार, पो.उप.निरी.अनिल वाघामोडे यांनी केला. त्यांना शशिकांत खाडे, अमर नारनवर, पोपट चव्हाण, रूपाली फडतारे, जगन्नाथ लुबाळ, नवनाथ शिरकुळे, धीरज कवडे, वासीम मुलाणी, श्रीकांत सुद्रिक यांनी सहकार्य केले.

## मित्रच अखेर मित्राच्या जीवावर उठले...

येत होती. काही अंतरावर काही अंतरावर दारूच्या बाटल्याचे तुकडे पडले होते. तर मृतदेहाची बाजुला चप्पल पडलेली होती. पोलीसानी मयताची ओळख पटवून तपासाला सुरूवात केली. विकास गोपी सिंग हा मध्यप्रदेशातील १४२ सिल्हवर ग्राम, सिल्हवर पोस्ट, तालुका माझोली वार्ड १२ गतीबाग येथील असून तो गेल्या दीड वर्षापूर्वी कोल्हापूर जिल्हयातील कागल पंचतारांकित पंचतारांकित औद्योगिक वसाहत एमआयडीसीतील सुदर्शन जिन्स कंपनीत बॉयलर अडेडन्ड म्हणून काम करीत असे. त्या कंपनीतील अनेकांशी त्याची ओळख झाल्याने तो त्याच्याबरोबर दारू प्यायला बसत होता. बऱ्याचवेळेला त्याच्या कपंनीतील त्याचे मित्र त्यालाच दारू प्यायला पैसे खर्च दयायला लावायचे. त्या कंपनीत त्याला चांगला पगार ही होता. तसेच तो औद्योगीक वसाहतीतील कसबा सांगावच्या हद्दीत भाडयाच्या घरात राहत होता. त्याचे कुटूंब मध्यप्रदेशातील माझोली येथे राहत असल्याने तो तसा येथे एकटाच राहत होता. त्याला इथल्या मित्रांच्या संगतीने दारू पिण्याची सवय लागलेली होती. तो दारूत पैसे खर्च करीत होता. परंतु एखाद्याने पैसे हात उसणे मागतिले तर तो त्यांना हातउसणे पैसे देत नव्हता. त्यामुळे काही जण त्याच्याकडून दारू मिळते म्हणून त्याला पगाराच्या दिवशी गाठून दारूसाठी पैसे खर्च लावायचे. तो ही मोठया आंनदाने त्यासाठी पैसे खर्च करीत होता. तो काम करीत असलेल्या कंपनीत कसबा सांगाव येथील सुहास बाळासाहेब बिरंजे हा देखील कामाला होता. त्याची व विकास सिंग याची खास मैत्री बनली होती. विकास सिंग हा सुहास याच्या घरी ही येत जात होता. त्यामुळे त्याच्या घरचे लोक ही विकास सिंगला सुहासच्या घरचे लोक ही चांगले ओळखत होते. सुहासच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने त्याला नेहमी पैशाची चणचण भासायची. त्यासाठी तो महिनाभर अनेकांच्याकडून उधारी उसणवारी करीत असायचा. मागे देखील एकदा त्याने विकास सिंग याच्याकडून काही रक्कम हात उसणे पैसे घेतलेले होते.त्यावेळी ती रक्कम त्याने वेळेत ती रक्कम परत दिली नसल्याने परत विकास सिंग हा त्याला पैसे देत नव्हता. बऱ्याचवेळेला सुहासने त्याच्याकडे हात उसणे पैसे मागितले होते. परंतु मागील अनुभव लक्षात घेऊन विकास सिंगने त्याला पैसे दिलेले नव्हते. त्यामुळे सुहास बिरांजे हा त्याच्यावर चिडून होता. सुहासने याबाबत आपला जवळचा मित्र आदिनाथ मारूती लोंखडे याला या बाबत सांगितले. विकास सिंग हा परराज्यातील असून त्याला येथील कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी आहे. ती कंपनी येथील आपल्या सारख्या स्थानिक कामगारांना कमी पगारात राबवून घेत असून वेळेत पगार ही देत नाही. ही आपल्या स्थानिक कामगाराची गोची आहे. विकास सिंग हा एकटाच येथे राहतो. त्याला ना बायको ना पोरं ना कुटूंब मग त्याला मोठया पगाराची रक्कम काय कामाची असा त्या दोघांनी विचार केला. कसे ही करून त्याच्याकडून या  पगाराची रक्कम काढून घ्यायची आणि त्याला कायमची अद्दल घडवायची असे सुहासने मत मांडले त्याला आदिनाथ लोंखडे याने होकार दिला. कारण त्याला ही पैशाची गरज ही होतीच.आदिनाथ लोखंडे याचे मुळ गाव करवीर तालुक्यातील हळदी कांडगाव येथील असून तो ही कामाच्या निमित्याने कसबा सांगाव येथे राहयला आहे. त्याची व सुहास बिरांजे याची खास मैत्री असल्याने त्या दोघांनी विकास सिंग याच्याकडून पगाराची रक्कम काढून घ्यायची आणि आपली गरज भागवायची असा विचार त्यांनी केला. त्या दोघांना ही विकास सिंग हा फुल्ल दारू पितो हे माहिती होते. त्यातच शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी जिन्स कंपनीतील कामगाराचा पगार झालेला होता. विकास सिंग याला पगाराची मोठी रक्कम मिळालेली आहे याची माहिती सुहास बिरांजे याला होती. त्याने ही माहिती आपला मित्र आदिनाथ लोंखडे याला दिली. त्या दोघांनी ही आज विकास सिंग याला लुटायचे आणि त्याच्याकडून रक्कम काढून घ्यायची असा प्लॅन नक्की केला. संध्याकाळच्या सुमारास सुहासने विकास सिंग याला चल आज दारू प्यायला बसू असे सांगितले दारूचे नाव काढल्यावर विकास सिंग मनातून खुलला. ठीक आहे म्हणत त्याने सुहासकडे दारूच्या दोन खंब्यासाठी पैसे दिले. संध्याकाळच्या सुमारास सुहास त्याला आपल्या दुचाकी गाडीवर बसवून कसबा सांगाव आणि पंचतारांकित औदयोगीक वसाहतीतील मगदुम मळ्यातील वनीकरण असणाऱ्या एका निर्जन ठिकाणी गेले. तेथे अगोदरच आदिनाथ लोंखडे हा थांबला होता.एका निर्जन ठिकाणी ते तिघे ही गाडी लावून दारू प्यायला बसले.दारु पित असताना मुद्दामच विकास सिंगकडे सुहासने पैसे मागितले.त्यावेळी विकास सिंगने माझ्याकडे आता पैसे नाहीत मी तुला पैसे देऊ शकत नाही असे स्पष्टच सांगितले. यावर सुहासने तुझा आज पगार झालेला आहे आणि मला पैसे नाही म्हणतोस म्हणून त्याच्याबरोबर भांडण काढायला सुरूवात केली. त्याला त्या दोघांनी शिव्या देत लाथाबुक्यांनी मारायला सुरूवात केली. त्याच्याकडेचे पैसे काढून घ्यायचे म्हणून त्या दोघांनी आधी त्याच्या पॅन्टेच्या खिशात हात घालून त्याचे खिसे तपासले. त्याला विकास हा विरोध करीत होता. त्या दोघांनी त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत गप्प बसविले.मुद्दामच परत त्याच्या तोंडात दारू जबरदस्तीने ओतली. कच्ची दारू नरड्यात गेल्यावर तो जास्त तडफडू लागला. त्यावेळी आदिनाथाच्या हाताला विकासच्या खिशात परत हात घातला त्याच्या हाताला पैशाचा बंडल लागला. ते चांगले २० ते २५ हजार रुपये लागले. त्याच्याकडून ती रक्कम घेऊन विकास सिंग याला खाली पाडले.तो दारूच्या नशेत असल्याने त्याला नीट उठता ही येत नव्हते. तो उठण्याचा प्रयत्न करीत असताना सुहासने बाजुलाच पडलेला मोठा दगड उचलला आणि विकास सिंग याच्या डोक्यात घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला. एवढयावरच ते दोघे थांबले नाहीत त्यांनी तोच दगड परत विकासच्या तोंडावर मारला. त्यासरशी त्याचा चेहरा विद्रुप करण्यात आला. त्यात जागीच त्याचा मृत्यू झाला. त्या दोघांनी त्याला ओढत जवळच्या झाडा झुडूपात नेऊन टाकले. त्याला ओढत असताना बाजुलाच त्याचे चप्पल पडले. तर दारूचे ग्लास ही बाजुलाच फेकले गेले. त्यानंतर त्या दोघांनी अंधाराचा फायदा घेत आपल्या दुचाकी गाडीवरून पळून गेले. दुसऱ्या दिवशी या वनीकरण विभागात काही जण गुरे चारण्यासाठी गेले असताना त्यांना झाडाझुडुपात एका तरूणाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडलेला दिसला. त्यांनी या घटनेची माहिती ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना दिली. त्यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.या घटनेची माहिती त्यांनी कागल पोलीसांना दिली. कागल पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.गजेंद्र लोहार, पो.उप.निरी.वैभव जमादार नागेश खैरमोडे यांनी भेट दिली. वनिकरण परिसरात ज्या ठिकाणी मृतदेह पडलेला होता. त्याच्या १०० मीटर परिसरात दोन चप्पला पडल्या होत्या.जवळच दारूच्या बाटल्या होत्या. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह कागल येथील सरकारी दवाखान्यात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथकाला पाचारण केले. श्वान पथक ही काही अंतरावर जाऊन घुटमळले. घटनास्थळी स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पथक आणि ठसे तज्ञांना बोलविण्यात आले. या घटनेची माहिती पोलीसांनी स्थानिक लोकाकडून घेऊन मयताची ओळख पटविली. मयत हा मध्यप्रदेशातील विकास सिंग असून तो पचंतारांकित सुदर्शन जीन्स कंपनीत कामाला असल्याची माहिती पोलीसांनी मिळाली. घटना घडून ही दोन दिवस उलटले तरी या घटनेचा उलघडा पोलीसांना होत नव्हता. कागल पोलीसाबरोबर या घटनेचा तपास कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस करीत होते. मयत विकास सिंग याच्या मित्राची माहिती पोलीस घेत असताना शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी मयत विकास सिंग याच्याबरोबर कसबा सांगाव येथील सुहास बिरांजे हा असल्याची माहिती मिळाली. त्याचप्रमाणे पोलीसांनी कंपनी परिसरातील सीसटीव्ही फुटेज तपासले असता. संध्याकाळच्या सुमारास एका दुचाकीवरून मयत विकास सिंग आणि सुहास बिरांजे हा जाताना दिसत होते. या संशयावरून स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पोलीसांनी कसबा सांगाव येथून सुहास बिरांजे आणि आदिनाथ लोंखडे यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना ते दोघे ही पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होते. त्यांना  पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करू विकास गोपी सिंग याच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून त्याच्याकडील पैसे हडप करण्यासाठी केला असल्याची माहिती पोलीसांन दिली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेत पोलीसांनी स्वतः फिर्यादी होऊन या घटनेची नोंद पोलीस स्टेशनात केली. विकास गोपी सिंग (२४) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी सुहास बाळासाहेब बिरांजे (३४) आणि आदिनाथ मारूती लोंखडे (२२) रा.दोघे कसबा सांगाव याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) ३ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना कागल येथील न्यायालयात उभे केले असता. मा.न्यायालयाने त्या दोघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला दगड आणि दुचाकी जप्त केली. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक महेंद्र पंडित याच्या मार्गदर्शनाखाली कागल पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पोलीसांनी करून संशयीतांना कोणताही पुरावा नसताना ताब्यात घेतले.

पान ८ वरून....

## चिखलडोंगरी येथील सब स्टेशनच्या ...

वीजेचा पुरवठा पुढील दीड ते दोन वर्षांमध्ये वसई सर्कलला उपलब्ध होईल, अशी माहिती भूमीपुजनावेळी देण्यात आली. तसेच सोपारा वीज केंद्रमध्ये मंत्री महोदयांच्या बैठकीनंतर १०० मेगावाट ट्रान्सस्फोर्मर बसविण्यात आला असून पुढील महिन्यामध्ये अजून ५० मेगावॉट ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार आहे. तसेच वसई पूर्वेला कामण, स्मार्ट सुरक्षासिटी व कोपरी येथे अजून ३ विद्युत केंद्रे येत्या २ ते ३ वर्षात कार्यान्वित होतील असे ही आश्वासन ऊर्जा मंत्र्यांद्वारे देण्यात आले आहे.

## वसईतील हिरवळ आणि येथील एकंदर ...

आणि माझ्या लेखनाला अस्मिता दिली. या कार्यक्रमानंतर, लोपीस हे स्वतः स्वामींचे भक्त आणि स्वामी समर्थ मठाचे हितचिंतक असल्याने ते उषाताईंना भुईगांव येथील समर्थांच्या मठात मुक्कामास घेऊन आले. उषाताईंच्या हस्ते स्वामींची आरती करण्यात आली. तसेच त्यांनी स्वामींच्या गायलेल्या गाण्यांच्या रेकार्ड्स ने मठ परिसर भक्तीरसात न्हाऊन गेला. मठाचे सर्वेसर्वा संदिप म्हात्रे आणि त्यांच्या सर्व सहकार्यांच्या आदरातिथ्याने उषाताई विलक्षण भारावून गेल्या. उषाताईंनी आज विरार येथील जागृत देवस्थान असलेल्या जीवदानी मंदिरास भेट देऊन मातेचे दर्शन घेतले. माजी महापौर राजीव पाटील आणि ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी उषाताईंचा येतोचित गौरव केला.

## राहुल गांधींना जीवे मारण्याचा भाजपाचा...

नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे तो आंदोलन आणि निवेदने देऊन सरकारपुढे आपली समस्या मांडत आहे. नुकतीच काही शेतकऱ्यांनी आपल्या रक्ताने स्वाक्षरी केलेली निवेदने मुख्यमंत्री ताफ्यात घुसून दिल्याची माहिती समोर देशात राहुल गांधीची लोकप्रियता वाढत आहे. याच गोष्टीची भीती मनात धरून भाजप गांधींचा देशभर विरोध करत आहे. खरंतर गांधींना विरोध ही नथुराम गोडसेची प्रवृत्ती आहे, असे प्रतिपादन कॉंग्रेस विधी मंडळ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. भाईंदरमध्ये कॉंग्रेस पक्षाचा कोकण विभागीय मेळावा पार पडला. त्यावेळी ते उपस्थितीत होते. या प्रसंगी त्यांनी शेतकरी आंदोलन आणि अन्य विषयांवर भाष्य करीत भाजप सरकारवर टीकास्त्र सोडले. आमदार नितेश राणे हे सातत्याने सामाजिक तेढ निर्माण करणारे वक्तव्य करत आहेत. राणे हे फार छोटे आहेत. मात्र त्यांच्या मागे एक प्रवृत्ती आहे. त्या प्रवृत्तीला राज्यात दंगली घडून सत्ता मिळवायची आहे, असे आरोप बाळासाहेब थोरात यांनी केले.

## कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण...

देण्याचे काम करत आहेत. याप्रसंगी शैक्षणिक, राजकीय, उद्योग, सहकार, आरोग्य, क्रीडा, प्रशासन, आदि क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजकीय सामाजिक क्षेत्रातील तसेच मॉर्निंग वाक ग्रुप, संस्थाचालक संघटना, शिक्षक संघटना, साने गुरुजी शैक्षणिक संकुल, शिक्षक, मुख्याध्यापक आदी सर्वच क्षेत्रातून अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी केले. आभार महादेव डोंबे यांनी मानले.

## ‘हवामान बदलाचे परिणाम संपूर्ण ...

२०१५ पासून जेव्हा पॅरिस करार स्वीकारला गेला, तेव्हापासून २०२१ प्रस्तावित कोळसा ऊर्जा प्रकल्पांची मागणी ७५% कोसळली. तथापि, आज जागतिक कोळशाचा वापर आणि क्षमता पुन्हा वाढत असून २०२३ पासून ती सार्वकालिक उच्च पातळीवर वाढत आहे. आशियाई देशांमधील मजबूत मागणीमुळे, जीवाश्म इंधनापासून दूर संक्रमणाला गती देण्याचे वचन देऊनही अमेरिका, युरोप या देशांमधील श्रीमंत देश या कोळशाच्या विस्तारावर दुर्लक्ष करीत आहेत. दुबईतील सीओपी-२८ (COP28) ने दशकाच्या समाप्तीपूर्वी हवामान कृतीला चालना देण्यासाठी जगातील पहिल्या ‘जागतिक स्टॉकटेक’ यावर सुमारे २०० पक्षांनी घेतलेल्या निर्णयाचा एक भाग म्हणून जीवाश्म इंधनापासून दूर जाण्यासाठी राष्ट्रांना आवाहन केले. तथापि, जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२३ दरम्यान, व्यापारी बँकांनी कोळसा उद्योगाला ४७० अब्ज युएस डॉलर इतके कर्ज प्रदान केले असे सामाजिक कार्यकर्ते पर्यावरणप्रेमी मॅकेन्झी डाबरे यांनी माध्यमांना पत्रकद्वारे सांगितले. आशियातील कोळशाचे टप्पे बाहेर पडणे जलद, न्याय्यपणे होणे आवश्यक आहे. त्यासाठी जागतिक स्तरावर निधी मिळणे आवश्यक आहे. त्यात हवामान संकटाच्या अग्रभागी असलेल्या कामगार आणि समुदायांसाठी पर्यायी सभ्य जॉब, उपजीविका आणि घरे प्रदान करणे आवश्यक असल्याचे मत मॅकेन्झी डाबरे यांनी व्यक्त केले. वसईत यावेळी जनजागृती कार्यक्रम व निषेध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. आम्ही काळजीत आहोत की, कोळसा वापर वाढत आहे. सरकार आणि कॉर्पोरेशनना नवीन कोळशाचा विस्तार ताबडतोब थांबवावा आणि आशियातील विद्यमान कोळसा वेगाने बाहेर काढावा असे आवाहन त्यांनी केले आहे. कोळशावर आधारित ऊर्जा प्रकल्प नष्ट करावेत. हवामान बदल व प्रदूषणमुळे आमच्या  जमीन, पाणी आणि हवा विषारी झाली आणि ग्लोबल साउथमध्ये असमानता वाढली, एशियन पीपल्स मूव्हमेंट ऑन डेट अँड डेव्हलपमेंट (APMDD) चे समन्वयक लिडी नॅकपिल म्हणाले. कोळसा हे आशियातील वाढत्या मागणीचे उत्तर नाही. अक्षय ऊर्जा हे सर्वत्र विजेचे सर्वात स्वस्त स्त्रोत बनले आहेत. आम्ही जीवाश्म इंधनावरील अनुदान टप्प्याटप्प्याने काढून टाकणे आणि वित्त स्वच्छ ऊर्जा संक्रमणाकडे वळविण्याचे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले, यामुळे स्वच्छ अक्षय ऊर्जा अधिक सुलभ होईल. ग्लोबल साउथ छक्रू चे सरचिटणीस शक्तीमान घोष म्हणाले.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्था पाली ...

भाजप युवा मोर्चाचे सुशील अवसरकर, ऑनिडा कंपनीच्य एच.आर. आणि संस्था व्यवस्थापन समिती सदस्य श्रीमती सीमा चुंभळे, जनकल्याण सामाजिक संस्थाचे संचालक नितीन जाधव, दांडेकर महाविद्यालयाचे प्रा.किरण थोरात, एम डी व्होकॅशनल संस्थेचे मोतीराम पाटील असे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने तालुक्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संविधानाविषयी जनजागृती व्हावी याकरिता निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा, रांगोळी स्पर्धा असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले होते. त्यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. तत्पूर्वी प्रा.किरण थोरात यांनी संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना संविधानाचे सर्वसामान्यांच्या आयुष्यातील महत्त्व या विषयावरती उत्तम असे व्याख्यान दिले. संविधानाचे महत्व सर्व विद्यार्थ्यांना कळावे त्याविषयी जनजागृती व्हावी या हेतूने महाराष्ट्रातील प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संविधान मंदिर स्थापन करण्याचा एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला असल्याचे मत राम जाधव यांनी व्यक्त केले. प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या कौशल्याला वाढवण्याचा प्रयत्न करून स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि संविधानिक स्वातंत्र्याचा वापर करून उत्तम नागरिक बनावे, याकरिता ओनीडा सारखी कंपनी सदैव मदत करेल, असे प्रतिपादन श्रीमती सीमा चुंबळे यांनी केले. भारतीय घटना ही सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या जगण्यातील महत्त्वाचा भाग असून या घटनेची उद्देशिका ही भारतीय लोकशाहीचा आरसा आहे. उद्देशिकेतून उध्दृत होणारा घटनेच्या मूळ ढाच्याला कधीही हात लावता येणार नाही. या उद्देशिकेतील शब्द न शब्द भारतीय संस्कृती प्रकट करतो, असे संस्थेचे प्राचार्य रोहन चुंबळे यांनी सांगितले. तसेच संविधानाच्या प्रचार प्रसारात सर्वसामान्य नागरिकांनी सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाकरिता संस्थेचे किरण सोनवणे, निरज पाटील, पंडित पाटील, शिवाजी निकम, अनिकेत अवसरकर, सोनाली जाधव, अंकिता सांबरे यांनी काम पाहिले.

## लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाचे ...

असे त्यांनी सांगितले. लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरासाठी जिल्ह्यातील बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, कंत्राटदार तसेच नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. त्यांच्या सहभागामुळे शासकीय रक्तपेढीमध्ये रक्तसंकलनाला हातभार लाभेल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख म्हणाले. तसेच या शिबिराचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. तसेच इतक्या व्यापक स्वरूपातील शिबीर आयोजित केल्याबद्दल विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांना सन्मानपत्र देण्यात आले. उपअभियंता संजय सावंत आणि राजेंद्र बिराजदार यांनी या शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शाखा अभियंता भास्कर कांबळे यांनी केले. यावेळी लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाड्यात ईद ए मिलादनिमित्त...

समभावाचे विचार मनी रुजावे, भाईचारा, शांती व सद्भावना निर्माण व्हावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी मुस्लिम बंधवांसह वाड्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे, पोलीस उपनिरीक्षक मयूर शेवाळे, पोलीस हवालदार चेतन सोनवणे, गजानना जाधव, दिवे, पऱ्हाड आदी उपस्थित होते.

23 TO 29 SEPTEMBER 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 9/21/2024 8:09 PM Page 1



# बुद्ध विहाराच्या माध्यमातून गौतम बुद्धांचे शांतता आणि समानतेचे विचार समाजापर्यंत पोहोचतील-रामदास आठवले




**लातूर/प्रतिनिधी**

औसा येथील तक्षशिला बुद्ध विहार विकास कामांचे लोकार्पण करताना अतिशय आनंद होत आहे. या बुद्ध विहाराच्या माध्यमातून गौतम बुद्धांचे शांतता आणि समानतेचे विचार समाजापर्यंत पोहचण्यास मदत होणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले. औसा येथील तक्षशीला बुद्धविहार विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजननिमित्त विजय मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ना. आठवले बोलत होते. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार बसवराज पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, भन्ते पय्यानंद, औसा नगरपरिषद मुख्याधिकारी श्री. शिंदे यांच्यासह तक्षशिला बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. गौतम बुद्धांच्या विचारांचा अंगीकार करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील प्रत्येक व्यक्तीला समानतेची वागणूक मिळावे, अशी त्यांची भूमिका होती. सर्व जाती-धर्मांच्या कल्याणाचा विचार करून त्यांनी भारतीय राज्यघटना तयार केली, असे ना. आठवले म्हणाले. औसा परिसरात आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून सर्व समाज घटकांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात कामे झाली आहेत. जवळपास ११० गावांमधे त्यांनी समाज भवन बांधकामासाठी सहाय्य केले असून औसा येथील तक्षशीला बुद्ध विहारासाठी २ कोटी रुपये निधी त्यांनी दिला आहे. त्यामुळे गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रसार होवून समाजाच्या विकासाला हातभार लाभेल, असे ना. आठवले म्हणाले. औसा येथील बुद्ध विहार आणि येथे होत असलेल्या विविध कामांमुळे याठिकाणी येणाऱ्या उपासकांना चांगल्या सुविधा निर्माण होणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यावेळी म्हणाले. तक्षशीला बुद्ध विहार येथील विविध कामांसाठी २ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याठिकाणी स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करून समाजातील युवकांना स्पर्धा परीक्षा पूर्वतयारीसठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासह विविध विकास कामांसाठी निधी देणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले. तसेच सर्व समाजाला सोबत घेऊन विकास कामे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. माजी मंत्री बसवराज पाटील यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात भिख्खू संघाच्या वतीने आमदार अभिमन्यू पवार यांना गौतम बुद्धांची मूर्ती आणि मानपत्र देण्यात आले. भन्ते पय्यानंद यांनी मानपत्रचे वाचन केले. भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते नागसेन बोधी, भन्ते धम्मसार, तक्षशिला बुद्ध विहार ट्रस्टचे अशोक बनसोडे, राजेंद्र बनसोडे यावेळी उपस्थित होते. माजी नगरसेविका कल्पना डांगे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रारंभी औसा येथील तक्षशिला बुद्ध विहार येथील टप्पा-१ मधील विकास कामांचे लोकार्पण आणि टप्पा २ मधील विकास कामांचे भूमिपूजन केंद्रीय सामजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. तक्षशिला बुद्ध विहार विकास कामांच्या पहिल्या टप्प्यात ध्यानधारणा केंद्र इमारतीचे बांधकाम आणि नूतनीकरण, प्रवेशद्वार ते ध्यानधारणा केंद्रापर्यंत पायऱ्या, तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीसाठी चबुतरा, विद्युतीकरण आदी कामांचा सामावेश आहे. तसेच याठिकाणी प्रवेशद्वार, संरक्षण भिंत, उद्यान विकसित करणे आदी कामे दुसऱ्या टप्प्यात होणार आहेत.

# भिवंडीत रवींद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते गणेश दर्शन स्पर्धेचा पारितोषक वितरण सोहळा संपन्न




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील एकात्मतेचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळ व स्वाभिमान सेवा संस्था आयोजित गणेशोत्सव सोहळ्यास महाराष्ट्राचे बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी भेट देऊन गणपती बाप्पांचे दर्शन घेतलं. यावेळी संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाभिमान सेवा संस्थेतर्फे शहरातील इतर गणेशोत्सव मंडळांनी राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण पूरक सामाजिक संदेश देणारे देखावे उभे करावेत यासाठी मागील २१ वर्षापासून स्वाभिमान श्री गणेश दर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या गणेश दर्शन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा रवींद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते पार पडला. या प्रसंगी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी रशीद, भाजपा शहराध्यक्ष अॅड हर्षल पाटील, युवा मोर्चा अध्यक्षा राजू चौघुले यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली गणेशोत्सव मंडळ धार्मिक कार्यक्रम करून थांबत नसून या काळात नेत्र चिकित्सा, रक्तदान, चित्रकला स्पर्धा सारख्या कार्यक्रमांचे आयोजन करून सामाजिक जाणीव जोपासत खऱ्या अर्थाने राष्ट्र भावना वाढीसाठी करू करीत असल्याचे सांगत रवींद्र चव्हाण यांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. शहरातील रोख पारितोषिक असणारी ही एकमेव स्पर्धा असून या मध्ये ओमकार मित्र मंडळ कोंबडपाडा, जयहिंद मित्र मंडळ पद्मानगर, सार्वजनिक गणेशोत्सव गणपती मंदिर, प्रभू आळी या मंडळांना अनुक्रमे तीन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर रौप्य महोत्सवी, सुवर्ण महोत्सवी व अमृत महोत्सवी वर्ष साजरा करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांचा सन्मान करण्यात आला.

# गणेश विसर्जनासाठी गेलेल्या तरुणाचा तलावात बुडून मृत्यू



**विरार/प्रतिनिधी**

विरार पूर्वेच्या टोटाळे तलावात गणेश विसर्जनासाठी गेलेल्या तरुणाचा तलावात बुडून मृत्यू झाला आहे. अमित मोहिते (२४) असे या तरुणाचे नाव असून बुधवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. अमित मोहिते हा विरार पूर्वेच्या फुलपाडा परिसरात राहत आहे. मंगळवारी अनंत चतुर्थीच्या दिवशी गणेश विसर्जनासाठी गेला होता. विसर्जन मिरवणुक ही बुधवारी सकाळी पहाटे पर्यंत सुरू होती. यावेळी अमित हा विसर्जनासाठी विरारच्या टोटाळे तलावात उतरला होता. याच वेळी अमित याला फिट आली आणि तो पाण्यात पडला. याच दरम्यान त्याचा मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने त्याचा मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या संकल्पनेतून स्वच्छता ही सेवा मोहिमेत सर्व विभागांनी सहभागी व्हावे -जिल्हाधिकारी गोविंद बोडके

**पालघर/प्रतिनिधी**



स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या मोहिमेचा शुभारंभ १७ सप्टेंबर रोजी होणार असून २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत सर्व विभागांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत बैठक घेण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रापं चंद्रशेखर जगताप, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक धनराज पांडे, शिक्षणाधिकारी शेषराव बडे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रकल्प संचालक राजेश पाध्ये, जिल्हा लसिकरण अधिकारी सागर पाटील, पालघर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, डहाणू नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव आवारे आदी उपस्थित होते. गटविकास अधिकारी तसेच क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. स्वच्छतेचे काम शासनाचा उपक्रम आहे म्हणून न करता कायम स्वरूपी करण्याचे नियोजन करावे. तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर विविधि विभागांची बैठक आयोजित करावी. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी सर्वांना सूचना द्या. वेगवेगळे नाविण्यपूर्ण उपक्रम करावेत, त्याचबरोबर त्याचे छायाचित्र पोर्टलवर अपलोड करावेत. समुद्र किनारी स्वच्छता बाबतही सर्वांनी नियोजन करावे. अशा सूचना यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी दिल्या. ग्रामीण भागात रस्त्यालगत कचऱ्याचे ढिगार्यांना प्रतिबंध घालण्यासाठी कारवाई करण्यात येणार असून या अभियान कालावधीत सफाई मित्रांना लाभ द्यायचा आहे, त्याचबरोबर टाकाऊ पासून टिकाऊ यासाठी तसेच विविध स्पर्धांसाठी पारितोषिके देण्यात येणार आहेत. सहकारी गृह संस्था, विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, सामजिक संस्था या सर्वांना सहभागी करुन उपक्रम करावेत. सफाई कामगारांच्या कल्याणांसाठीच्या योजनाही राबवाव्यात. असे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी सांगितले. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक धनराज पांडे यांनी संगणकीय सादरीकरणातून दैंनदिन उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

# नेत्र तपासणी शिबीराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद



**वाडा/प्रतिनिधी**

भक्ती वेदांत रुग्णालय आणि संशोदन संस्था व धर्मवीर विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या नेत्र तपासणी शिबीराला तिळसे गाव व परिसरातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. सदर शिबिरात दोनसेहून अधित नागरिकांची नेत्र तपासणी करून त्यांना मोफत चस्मे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील प्रत्येक गोर गरीब गरजवंत नागरिकांची सेवा करता यावी यासाठी तिळसे गावात शिबिराचे आयोजन केले होते या नेत्र तपासणी शिबिरा नंतर अशीच लोकसेवेची कामे आमच्या धर्मवीर विचार मंचच्या माध्यमातून यापुढेही करत राहणार असल्याचे मत धर्मवीर विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पष्टे यांनी व्यक्त केले.

# तक्षशिला कनिष्ठ महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घान!




**उल्हासनगर/प्रतिनिधी**

सुभाष टेकडी येथील तक्षशिला महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन, महाराष्ट्रातील १००० केंद्रासह ऑनलाईन पद्धतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वर्धा येथून एकाच वेळी करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित करण्यात आला. महाराष्ट्रातील १००० व ठाणे जिल्ह्यातील ५८ केंद्रांचे एकाच वेळेस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले त्यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजीत पवार यांच्या सह केंद्र व राज्यातील मंत्री गण व ऑनलाईन हजारो शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. संस्थे मार्फत कौशल्य विकास योजने अंतर्गत अत्यल्प दरात नर्सिंग कोर्स सह कपींग व डायटेशियनचे कोर्स मोफत देण्यात येणार असल्याचे ह्यावेळी सांगण्यात आले व प्रवेशासाठी उपस्थित विद्यार्थी व पालकांना आवाहन करण्यात आले. ह्या वेळी कार्यक्रमास महामहिंद इंटरनॅशनल धम्मदूत सोसायटी चे उपाध्यक्ष डी.बी.इंगळे, महासचिव राजेश वानखेडे, कोषाध्यक्ष व्हि.टी. वानखेडे, सदस्य सुबोध गोंडाणे, विजय तायडे, अॅड अश्विनी धांडे, अॅड संजय ससाणे, मुख्याध्यापिका अस्मिता भालेराव, विद्या भारसाखळे, भारती देवरे, शासनाचे नोडल अधिकारी संदीप चौधरी, संस्थेचे वरिष्ठ लिपीक आखरिखत सव्वाखंडे, माध्यमिक व कनिष्ट महाविद्यालयाचे प्राध्यापक, माजी मुख्याध्यापक मोहम्मद नासर पटेल, शिक्षक व हजारो विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी किरकिरे यांनी केले.

# यंग स्टार ट्रस्ट आयोजित आभार सोहळा




**नालासोपारा/प्रतिनिधी**

यंग स्टार ट्रस्ट अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर तसेच किणी फाउंडेशन आयोजित गणेशोत्सव सोहळा यशस्वीपणे पार पडण्यास सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे आभार मानण्यासाठी आभार सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्मृतीचिन्ह, तुळशी वृंदावन देऊन समस्त नागरिकांचे आभार मानण्यात आले. दहा दिवसाच्या गणेशोत्सवात हजारो सार्वजनिक गणपती तसेच लाखो घरगुती गणपती यांचे विसर्जन सार्वजनिक तलावात होते यावेळी पोलीस कर्मचारी, महानगरपालिका कर्मचारी तसेच विसर्जन करण्यास सहकार्य करणाऱ्या विविध सामाजिक संस्था यांचे काम खरोखरच महत्वाचे आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे इतका मोठा सण अगदी चांगल्या पद्धतीने, उत्साह पूर्ण वातावरणात तसेच शांततेने पार पडला. दहा दिवस त्यांनी केलेले मेहनत आणि लोकसेवेची भावना याचा आदर करणे महत्त्वाचे आहे. अशी संकल्पना आमदार क्षितीज ठाकूर यांची होती. यावेळी कार्यक्रमास शिखर ठाकूर, हेमंत म्हात्रे, परेश किणी, अजय शेठ, माजी सभापती, अतुल साळुंखे, किशोर पाटील, माजी नगरसेवक नरेश जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन परेश किणी यांनी केले होते.

# ६२ किलो गांजासह ३० लाखांचा मुद्देमाल हस्तगत; चौघांना अटक




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

तुळजापूर तालुक्यातून कारमधून ६२ किलो गांजा घेऊन जाताना सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून चार जणांना जेरबंद करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ३० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या पथकाने ही कारवाई केलेली आहे. धीरज दिलीप मोरे, शरद संजय उबाळे, समाधान पोपट गायकवाड, अमोल राहुल कांबळे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर हे गांजाच्या वाहतुकीवर लक्ष ठेवून होते. तुळजापूर ते बार्शी रोडने इनोव्हा कार मधून गांजा वाहतूक होत असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यावरून पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांनी पथकासह १६ सप्टेंबर रोजी गौडगाव गावच्या शिवारात सापळा लावून थांबले होते. तुळजापूर कडून गौडगाव कडे इनोव्हा येत असल्याचे दिसून आले. त्यावेळी सापळा पथकाने सदरची इनोव्हा कार व त्यामध्ये एकूण चार जण मिळून आले. तसेच इनोव्हा कारच्या मागील सीटवर दोन पांढऱ्या रंगाच्या पोत्यामध्ये ६२ किलो १३५ ग्रॅम गांजा, सहा मोबाईल इनोव्हा कार असा एकूण ३० लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला आहे. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयाने शनिवार पर्यत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

# विरार पोलीस ठाण्यातील गणपती बाप्पांचे विसर्जन!



विरार : शनिवारी सायंकाळी गणपती विसर्जनासाठी विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांच्या हातातून गणपती उचलला आणि पोलीस कर्मचाऱ्यांसह त्याचे विसर्जन केले. विरार पोलीस ठाण्यात हा गणपती ६ वर्षांपासून बसवला जात आहे. शेवटच्या दिवशी विरारच्या टोटाले तलावात श्री गणेशजींचे विसर्जन मोठ्या आवाजात बॅण्ड, पठाखो, गुलालाची उधळण करत नाचत होते.




# टोरेंट पॉवरद्वारे मुलांमध्ये विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा संरक्षण जण जागरूकता

**भिवंडी/प्रतिनिधी**

टोरंट पॉवर लिमिटेड, भिवंडी यांच्या वतीने विजेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राहनाळ येथील झेड पी शाळा मध्ये व्यापक सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ६० विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन आणि टोरंट पॉवर चे अधिकारी सहभागी झालेल्या या सत्रात तरुणांना विजेविषयी आवश्यक ज्ञान मिळावे, हा उद्देश होता. या सत्रात विजेशी संबंधित आवश्यक विषयांवर लक्ष केंद्रित केले गेले असून विद्यार्थ्यांना त्याचा वापर आणि त्याच्याशी संबंधित संभाव्य धोक्यांबद्दल मूलभूत माहिती प्रदान करण्यात आली दैनंदिन जीवनात सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित करून विद्युत उपकरणे वापरताना कोणती खबरदारी घ्यावी, याविषयी उपस्थितांना माहिती देण्यात आली. विजेच्या बचतीच्या तंत्रावर चर्चा, विद्यार्थ्यांना घरी आणि शाळेत ऊर्जा बचतीच्या पद्धतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करणे ही या सत्रातील प्रमुख वैशिष्ट्ये होती. तर टोरंट पॉवरच्या अधिकाऱ्यांनी रेसिड्यूअल करंट सर्किट ब्रेकर्स (आरसीसीबी) चे महत्त्व पटवून देत हे उपकरण विजेचे धक्के कसे रोखू शकते आणि जीव वाचवू शकते हे स्पष्ट केले. यावेळी टोरेंट पॉवरचे अधिकारी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# चिखलडोंगरी येथील सब स्टेशनच्या निर्मितीत आमदारांचे योगदान महत्वाचे – मोहन ननावरे

**विरार/प्रतिनिधी**



मंत्रालयापासून ते जिल्हाधिकारी आणि ही सब स्टेशनची जागा ताब्यात घेत त्या त्या कार्यालयापर्यंत पाठपुरावा करण्यासाठी आमदार हितेंद्र ठाकूर व आमदार क्षितीज ठाकूर यांचे एक तत्पर असे लोकप्रतिनिधी म्हणून महत्त्वाचे योगदान राहिलं आहे. या प्रबळ पाठपुरावामुळेच हे सबस्टेशन साधारणपणे २४ महिन्यात पूर्ण केले जाईल असे ही आश्वासन महापारेषणचे अधीक्षक अभियंता मोहन ननावरे यांनी कार्यक्रम प्रसंगी चिखल डोंगरी येथे दिले. यापुढेही काही अडचणी आल्यास आम्ही पुन्हा आमदारांकडेच येऊ, त्यावेळी ते नक्कीच आम्हाला मदत करतील अशी आशाही याप्रसंगी महापरेषणचे अधीक्षक अभियंता मोहन ननावरे यांनी व्यक्त केली. चिखल डोंगरी येथील या भूमिपूजन कार्यक्रमाला वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर, नालासोपारा आमदार क्षितीज ठाकूर, माजी महापौर नारायण मानकर, माजी स्थायी समिती सभापती जितुभाई शहा, अजीव पाटील, प्रशांत राऊत, माजी नगराध्यक्षा कांता पाटील, माजी नगरसेवक रंजन पाटील, वामन पाटील, माजी सरपंच रामचंद्र मेहेर, गोवालीज औद्योगिकचे अशोक ग्रोव्हर, अशोक कुलास, किशोर शेट्टी, महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता महेश भागवत, अधीक्षक अभियंता मोहन ननावरे, कार्यकारी अभियंता योगेश पोलपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. गावकरी आणि सर्वांच्या सहकार्याने १६७ कोटी खर्चाच्या २२२ केवी सबस्टेशन चा काम आज मार्गी लागले आहे अशा शब्दात आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आनंद व्यक्त केला. सबस्टेशनचं हे काम लवकरच मार्गी लागावे यासाठी येत्या चार दिवसात या कामासंबंधी आपण पुन्हा एक बैठक घेऊ त्यासाठी संबंधित सर्व अधिकारी आणि ठेकेदार यांच्याकडून तांत्रिक अडचणी समजून घेऊ आम्ही या सबस्टेशनच्या जमीन संपादनात सक्रिय असलो तरी आमच्यापेक्षा अधिकाऱ्यांनी त्या कामाचा पाठपुरावा घेणं आवश्यक आहे. आम्ही आपल्याला सहकार्य करायला नेहमीच तयार असतो अशा शब्दात आम ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना विश्वास दिला. अर्थात हे काम लवकरात लवकर मार्गी लागणं अपेक्षित आहे, पण अधिकारी एकमेकांना नाचवण्यात आणि आपली पॉवर दाखवण्यात धन्यता मानतात. तेव्हा आम्हाला मध्ये पडाव लागत, अशा लोकोपयोगी कामात अशा गोष्टी घडू नयेत, दिलेल्या वेळेत काम पूर्ण व्हावं यासाठी आपण येत्या चार ते सहा दिवसात एक बैठक घेऊ केवळ उद्घाटन केलं व नारळ फोडला असे नव्हे असे सांगत आमदार हितेंद्र ठाकूर यांनी या कामासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान या विद्युत केंद्रासाठी सुमारे १६७ कोटी खर्च अपेक्षित अजून सुमार १०० मेगावाट ...पान ६ वर

# राहुल गांधींना जीवे मारण्याचा भाजपाचा मानस –नाना पटोले



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांना जीवे मारण्याचा भाजपाचा मानस आहे. त्यामुळे गांधी विरोधात देशभरात वातावरण निर्माण करण्याचे काम महायुतीमार्फत केले जात असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. मिरा भाईंदरमध्ये पक्षाच्या कोकण विभागीय मेळाव्यात ते बोलत होते. मागील पंचाहत्तर वर्ष काँग्रेसने देशात संविधानाचे वातावरण निर्माण करून ठेवले होते. म्हणूनच एक चहा विकणारा व्यक्ती देशाचा पंतप्रधान होऊ शकला. मात्र भाजपा सत्तेत आल्यापासून संविधानाला धोका निर्माण झाला आहे. त्यात राहुल गांधी जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करत असल्यामुळे त्यांना धमकवण्याची भाषा सर्वत्र सुरू आहे. मात्र गांधी हे संविधानाच्या मार्गानेच आणि सत्य बोलत आहेत. त्यामुळे गांधींना धमकवणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. आणि याबाबतचा खुलासा खुद्द नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी करावा, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे. आज राज्यात शेतकऱ्यांची अंत्यत वाईट अवस्था आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत ...पान ६ वर

# सफाळे लायन्स क्लबचा गौरव सन्मान सोहळा संपन्न



**सफाळे/प्रतिनिधी**

लायन्स क्लब आफ सफाळेआयोजित जि.प.सदस्य स्व.संजय रामराव राऊत स्मृती प्रित्यर्थ लायन्स गौरव सन्मान २०२४ देवभुमी सभागृह सफाळे इथं पार पडला. पुरस्कार सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी लायन्स क्लब सफाळे प्रेसिडेंट लायन प्रमोद पाटील होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचांगकर्ते-खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण हे उपस्थित होते.

दा. कृ. सोमण यांच्या हस्ते लायन्स गौरव सन्मान२०२४ चा गौरव प्राप्त मान्यवराचा सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आदरपुर्वक देऊन पुरस्कृत करण्यात आले. यावेळी लायन प्रविण पाटील, लायन प्रमोद पाटील, लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन सुमित गांधी डिस्ट्रिक सेकंड व्हिडी नटवर बका, लायन मनोज म्हात्रे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. नरेंद्र सूर्यवंशी (कर्दळ), स्वातंत्र सैनिक भानुदास वैद्य (सफाळे), कैलास शेळके (पोलीस, सफाळे), महेश गोपीनाथ पाटील. (कृषी, मथाने), संजय अनंत पाटील मायखोपकर. (साहित्यिक), भीमराव रामचंद्र घरत. (सामाजिक, सोनावे), अनंत कडू (सहकार, सफाळे) आदींचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना जतिन कदमसर यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रतिभा कदम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व लायन सदस्यांनी मेहनत घेतली. मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

# वसईतील हिरवळ आणि येथील एकंदर निसर्ग पाहून मन आनंदाने भरून आले

## ज्येष्ठ पार्श्वगायिका उषाताई मंगेशकर यांचे भावोउद्गार

**वसई/प्रतिनिधी**

मुंबईत वाढते कॉंक्रीटचे जंगल आणि वाहनांच्या प्रचंड वर्दळीचा रोज सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर आज वसईतील हिरवळ आणि येथील एकंदर निसर्ग पाहून मन आनंदाने भरून आले आहे. हे हिरवे वैभव टिकवण्यासाठी नव्या पिढीने कार्यरत राहिले पाहिजे, असे उद्गार ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांनी वसई पश्चिमेच्या सत्पाळा येथील सेंट जोसेफ महाविद्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात काढले. रविवार आणि सोमवार अशा दोन दिवसांच्या वसई दौऱ्यात उषाताईंनी भुईगाव दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर त्यांचे जवळचे स्नेही व्याख्याते, तथा साहित्यिक मक्सवेल लोपीस यांच्या कुटुंबास वसई येथे सदिच्छा भेट देण्यासाठी आल्या होत्या. या निमित्ताने मक्सवेल लोपीस यांनी एका विशेष सोहळ्याचे आयोजन केलेले होते. या सोहळ्यात त्यांनी 'मला भेटलेले मंगेशकर' या



विषयावर व्याख्यान दिले. तसेच स्व. रेमंड तुस्कानो व स्व. जिलियन डिमेलो यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कु. अनुष्का नाईक या एका कर्तृत्ववान दिव्यांग मुलीचा आणि तिच्या पालकांचा उषाताई मंगेशकरांच्या हस्ते सत्कार घडवून आणला. याप्रसंगी ज्ञानदीप मंडळाचे अध्यक्ष फ्रान्सिस तुस्कानो आणि प्राचार्या कविता अल्मेडा मंचावर उपस्थित होत्या. उषा मंगेशकर यावेळी बोलताना म्हणाल्या, वसईचे पर्यावरण टिकवण्यासाठी येथे जनआंदोलने झालेली आहेत. पर्यावरण टिकून राहिले तर शुद्ध हवा, पाणी आणि आरोग्य टिकून राहील, यासाठी युवकांनी संघर्षाची तयारी ठेवली पाहिजे. मक्सवेल लोपीस यांचे कौतुक करताना त्या म्हणाल्या, मक्सवेल हा उत्तम गायक असून, त्यासोबत सिद्धहस्त लेखक सुद्धा आहे. मात्र गायनाकडे त्याने अधिक लक्ष द्यावे. अल्पवयातच त्याच्या लेखनाने वाचकांवर मोठा प्रभाव सोडला असून, भविष्यात त्याची कला आणि लेखन देश आणि विदेशातही कीर्ती मिळवेल, असे गौरवोद्गारही मंगेशकर यांनी यावेळी काढले. मॅक्सवेल लोपीस आपल्या व्याख्यानात यावेळी म्हणाले, आदर्श पाल्ये आणि आदर्श पालक कसे असावे? हे मला मंगेशकर परिवाराचा स्नेह लाभल्यावर अनुभवास आले. स्वर्गीय लतादीदी माझ्या गायकीतील गुरु असून, मात्र तत्त्वचिंतनातील गुरु पंडित हृदयनाथ मंगेशकर हे आहेत. मंगेशकर परिवारातील मॉनिटरची भूमिका बजावणाऱ्या उषाताई मंगेशकर यांच्या रूपाने आणि त्यांचा स्नेहआशीर्वादाने माझ्या आयुष्यात वसंत बहरला आहे. उषाताईंच्या घरातील कपाटावर ' गर्व से कहो हम हिंदू है' असे वाक्य लिहिले असून, त्याचवेळी कपाट उघडताच आत मध्ये येशू ख्रिस्ताचाही फोटो दिसून येतो. यातून मंगेशकर कुटुंबीयांच्या विशाल हिंदुत्वाचा परिचय होतो. मलाही संत मीराबाई, येशू ख्रिस्त आणि श्रीकृष्ण यांच्यात कधीच भेद वाटला नाही. मंगेशकरांनी मला महात्मा गांधी दिले, तसेच वीर सावरकरही दिले. प्रेम, भक्ती आणि मुक्ती दिलीच शिवाय याहून महत्त्वाचे मला ...पान ६ वर

# कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने कालिदास माने सन्मानीत



**लातूर/प्रतिनिधी**

येथील दयानंद सभागृहात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार-२०२४ सोहळ्यात सानेगुरुजी शैक्षणिक संकुलाचे संस्थापक तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रतिनिधी सभेचे अध्यक्ष कालिदास माने यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभ हस्ते सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी मंचावर खा. डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे (दिल्ली), मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, प्रा. विठ्ठल कांगणे, ह.भ.प.अनंत माने महाराज, जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, जिल्हाध्यक्ष अशोक देडे आदी उपस्थित होते. कालिदास माने हे शिक्षण आणि शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी चळवळीतून उदयास आलेले नेतृत्व आहे. शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरत लातूर जिल्हाच नव्हे तर मुंबई, नागपूर आदि ठिकाणी आंदोलने, मोर्चे, उपोषणे वेळ प्रसंगी अधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून प्रशासनास जागे केले आहे. शिक्षणाचा हक्क (RTE) कायद्यातील तरतुदीसाठी एक लाख शिक्षकांच्या स्वाक्षरी घेऊन राष्ट्रपतींना पाठवले होते. महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी सभेच्या माध्यमातून शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी गुणवंत शिक्षक व शाळांना जिल्हा निहाय पुरस्कार सोहळे घेत सन्मानित केले आहेत. शिक्षकांना न्याय व हक्क मिळवण्यासाठी रस्त्यावरील लढाई सोबतच कायदे मंडळात म्हणजेच विधान परिषदेत जाण्यासाठी २०१६ व २०२२ ची मराठवाडा शिक्षक मतदार संघात उमेदवार म्हणून थांबण्याचे धाडस करून ८ जिल्हे व ७६ तालुके पिंजून काढले होते. शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी लढत लढत शिक्षकांना रोजगार व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून साने गुरुजी च्या नावाने सानेगुरुजी शैक्षणिक संकुल उभारत साधारणता २०० शिक्षकांना रोजगार व हजारो विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण ...पान ६ वर

# 'हवामान बदलाचे परिणाम संपूर्ण मानवजातीसह पशू प्राणी भोगत आहे'

## जागतिक कृतीदिनी वसईत विविध ठिकाणी निदर्शने आणि रॅली आयोजन






**वसई/प्रतिनिधी**

हवामान बदलाचे परिणाम आपण सर्व मानवजातीसह पशू प्राणी भोगत आहेत. हवामान बदलास तेल-वायू व मुख्यतः कोळसा आहे. शाश्वत ऊर्जा वापरून, कोळसा पूर्णपणे संपवण्यासाठी १३ सप्टेंबर रोजी जागतिक कृतीदिनी आशियातील हजारो लोकांनी निदर्शने आणि रॅली आयोजित करून जलद आणि निष्पक्ष कोळसा बंद करण्याची मागणी केली. वसईतही यावेळी विविध ठिकाणी निदर्शने आणि रॅली आयोजन करण्यात आले होते. सीओपी-२९ (COP29) क्लायमेट समिटच्या अग्रभागी जीवाश्म इंधनाचा अंत करण्यासाठी स्पष्टपणे आवाहन करत एकत्रीकरणाची सुरुवात करून, कोळशाचा जलद टप्पा बाहेर काढण्याच्या मागणीसाठी आशियातील विविध शहरांमध्ये हजारो लोक निदर्शनांमध्ये सामील झाले. ९ देशांमधील ३० शहरे आणि प्रांतांमध्ये १०० हून अधिक समन्वित सामूहिक कारवाया झाल्या. मनिला, टोकियो, जकार्ता, बँकॉक, ढाका, काठमांडू, कराची, फैसलाबाद, कोलंबो येथे जोरदार निदर्शने झाली. भारतात महाराष्ट्र, तेलंगणा, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, ओडिशा, मणिपूर, झारखंड आणि पश्चिम बंगाल आदी राज्यात एनएचएफ (NHF) व पर्यावरण चळवळीच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाली. गेल्या काही वर्षांत, हवामानाच्या संकटाला प्रतिसाद म्हणून जगाने कोळशाचा वापर आणि उत्पादन निर्मूलनाच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. ...पान ६ वर

# औद्योगिक प्रशिक्षण संस्था पाली येथे संविधान मंदिराचे लोकार्पण



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील पाली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे शासनाच्या धोरणाप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या संविधान मंदिराचे उद्घाटन आभासी पद्धतीने (ऑनलाईन) माननीय उपराष्ट्रपती यांच्या हस्ते रविवारी (दि. १५) जागतिक लोकशाही दिनाच्या निमित्ताने पार पडले. मुंबईतील संविधान मंदिराचे स्वतः उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्याच वेळेस महाराष्ट्रातील ४३४ संस्थांमध्ये आभासी पद्धतीने त्यांच्या हस्ते संविधान मंदिराचे उद्घाटन त्याच वेळी करण्यात आले. तालुकास्तरावरील कार्यक्रमास तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक पाली येथील आय.टी.आय. येथे उपस्थित होते. कार्यक्रमास पाली पोशेरी ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंच श्रीमती प्राजक्ता शिंगडा, वाडा नगरपंचायतीचे माजी नगरसेवक राम जाधव, ...पान ६ वर

# लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाचे रक्तदान शिबिर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**

अभियंता दिन आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने बांधकाम भवन येथे आज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. १०५ जणांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून प्रत्येकाने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता सर्वश्री देवेंद्र नीळकंठ, एम. एम. पाटील, गणेश क्षीरसागर, उप अभियंता संजय सावंत, वाहतूक पोलिस निरीक्षक गणेश कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अपघातामधील जखमी किंवा इतर अनेक रुग्णांना रक्ताची आवश्यकता भासते.



अशावेळी गरजूंना पुरेशा प्रमाणात रक्त उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी रक्तदान करणे आवश्यक आहे. लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाने शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करून अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला आहे. प्रत्येक व्यक्तीने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी केले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामुळे आरोग्य विभागाला मदत होणार आहे. शासकीय रक्तपेढीमध्ये मुबलक प्रमाणात रक्त उपलब्ध होण्यासाठी असे उपक्रम राबविले जाणे आवश्यक आहे. तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले. तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तकेंद्र विभागात रक्तदान करता येईल, ...पान ६ वर

# वाड्यात ईद ए मिलाद निमित्त भव्य मिरवणूक



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील मुस्लिम समाज बांधवांनी ईद ए मिलाद निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते. धांगे कंपाउंड येथून मिरवणुकीला सुरवात करण्यात आली होती. ईद-इ-मिलाद हा सण मुस्लिम समाजासाठी अतिशय महत्वाचा असून मोहम्मद पैगंम्बर यांच्या जन्मदिनानिमित्त हा सण अतिउत्साने साजरा केला जातो. शांती व सदभावणेचा संदेश देण्याच्या उद्देशाने ही मिरवणूक काढण्यात आली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अदनान धांगे यांनी दिली. धांगे कंपाउंड येथून निघालेली मिरवणूक खंडेश्वरी नाका येथून मुख्य बाजारपेठेतून मशिद नाका मार्गे परळी नाका येथील दर्गा येथे मिरवणुकीची सांगता झाली. सदर मिरवणुकी शेकडो मुस्लिम बांधव उपस्थित होते. येथील दर्ग्यात देशात स्वधर्म ...पान ६ वर